काव्य
2829



REFBK-0022956
REFBK-0022956

# जिन्दादिल

भाऊसाहेब
पाटणकर

• प्रकाशक
अरुण पाटणकर
७५९ क, सोमवार पेठ,
तळेगाव दाभाडे ( पुणे )
४१० ५०६

• जिंदादिल
मूल्य १० रुपये
प्रथमावृत्ती, जुलै ८०

© भाऊसाहेब पाटणकर
टिळकवाडी
यवतमाळ
४४५ ००१
या संग्रहातील कोणत्याही मजकुराचा
उपयोग करण्यापूर्वी प्रकाशकाची
परवानगी घेणे आवश्यक आहे.

• मुद्रक
ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे
मंदार प्रिंटर्स
४९५-९६ शनवार पेठ,
पुणे ४११ ०३०

• मुखपृष्ठ
चित्रकार
चंद्रमोहन कुलकर्णी

• ब्लॉक्स
मे. के. जोशी
पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
२२९५९
ग्रंथ ३४२९
शाखा

## अर्पणपत्रिका

एखाद्या दर्जेदार साहित्य कलाकृतीचे मनापासून स्वागत करण्यात आपल्या विद्वत्तेला बाधा येत नसते असा समज असणारे कैलासवासी श्री. के. क्षीरसागर यांच्या पवित्र स्मृतीस सादर समर्पण !

## ऋणनिर्देश

मराठी शायरीच्या प्रथमदर्शनी जे पुरेपूर घायाळ झाले, तिच्या प्रेमात अगदी बुडून गेले, ते माझे रसिक मित्र सर्वश्री दिवाकर बुरसे, मधुकर टिल्लू आणि राघवेंद्र चव्हाण यांच्या अकृत्रिम, निरपेक्ष प्रेमाचा मला अभिमान वाटतो. ठिकठिकाणच्या रसिकांशी कार्यक्रमांच्या रूपाने ' मराठी शायरी ' ची भेट करवून देण्याची या त्रयीची स्पर्धा चाललेली असते.

भाऊसाहेब

# हितगुज –

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी ‘ मराठी शायरी ’ ही भाऊसाहेबांची पहिली कलाकृती प्रकाशित झाली. महाराष्ट्र शासनाने तिला पुरस्कार देऊन तिचा यथोचित गौरवही केला. त्यानंतरची ‘ मराठी मुशायरा ’, ‘ मैफिल ’ आणि ‘ दोस्त हो ’ ही तिन्ही प्रकाशने हातोहात संपली. आकाशवाणी आणि दूरदर्शनाच्या माध्यमातून भाऊसाहेबांची शायरी घरोघर पोचली. ठिकठिकाणी रंगलेल्या शेकडो मैफिलींनी रसिकांना तृप्त केले. तरीपण त्यांच्या पुस्तकाची मागणी संपली नाही.

अभिजात साहित्यसौंदर्याची मराठी मनाला लागलेली ही तहान मराठी शायरीने पुष्कळ अंशी भागवलेली आहे. शायरीसारखा अवघड प्रकार यशस्वीपणे हाताळणारे भाऊसाहेब अश्वमेधाला निघालेल्या विजिगिषुसारखे मैफिली जिंकत जातात. शृंगार ते अध्यात्मापर्यंतच्या त्यांच्या काव्यप्रवासात विनोद आणि चिंतन अखेरपर्यंत सोबतीला असतात.

नव्या संस्कारित आवृत्तीला ‘ दोस्त हो ’ असे नाव द्यावयाचे ठरले. त्यादृष्टीने पहिल्या फॉर्मची छपाई झाली. परंतु प्रारंभीची भाऊसाहेबांची शायरीवरील पुस्तके व या संकलनाचे स्वरूपच वेगळे असल्याकारणाने या पुस्तकाचे नाव ‘ जिंदादिल ’ असे निश्चित करण्यात आले.

भाऊसाहेब मैफिलीत सादर करीत असलेले बहुतेक सर्व शेर आणि रुबाया प्रथमार्धात पेश केल्या असून त्याच विषयावरील इतर शायरी द्वितीयार्धात सादर केली आहे. याशिवायची त्यांची इतर स्फुट रचनाही ‘ संकीर्ण ’ भागात समाविष्ट केली आहे. पूर्वीच्या प्रकाशनातील उत्कृष्ट शायरी ‘ जिंदादिल ’ मध्ये सामावण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला आहे. मात्र शायरीच्या महासागरातून निवडलेल्या मोत्यांना आमच्या ओंजळीची मर्यादा आहे.

शायरीशी रसिकांचे नाते चकोर आणि चंद्रकिरणासारखे आहे. ते तसेच राहावे किंबहुना पौर्णिमेला येणाऱ्या सागरभरतीप्रमाणे वृद्धिंगत व्हावे ही प्रार्थना !

काही तांत्रिक अडचणीमुळे या प्रकाशनाला झालेल्या विलंबाबद्दल क्षमस्व !

अल्पावधीत उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल ‘ मंदार प्रिंटर्स ’चे व्यवस्थापक, माझे मित्र श्री. विजय वाडेकर व अन्य कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार !

प्रकाशक

# ‘ बेधुंद मैफिल ’

यवतमाळच्या ॲडव्होकेट भाऊसाहेब पाटणकरांच्या मराठी शेरोशायरीची मैफिल ऐकण्याचा योग परवा पुन्हा एकदा आला. शनिवार दिनांक २ फेब्रुवारी १९८० रोजी रात्रौ ९–३० वाजता टिळक स्मारक मंदिराच्या सभागृहात.

या मंदिराच्या वास्तूत एक पावित्र्य आहे, प्रसन्नता आहे. विशेषतः जिथं लोकमान्यांच्या मूर्तीची स्थापना केली आहे त्या सभामंडपाची शान काही और आहे. तिथंच जमिनीवर उत्तम बिछायत, मूर्तीच्या पायाशी काही अंतरावर एकदोन फूट उंचीचं व्यासपीठ, त्यावर गादी, लोड वगैरे. प्रवेशद्वारापाशी काही प्रियदर्शिनी उभ्या. त्यांच्याकडे अत्तर-गुलाबाची व्यवस्था. एका ‘ सुकांत चंद्रानने ’च्या हातून आमच्या हाताच्या पालथ्या मुठीवर अत्तरात बुडवलेली चांदीची कांडी फिरते, अंगावर गुलाबपाण्याचा शीतल शिडकावा पडतो. तेवढ्यात दुसऱ्या हाताच्या मनगटावर एक सुंदरी चक्क ‘ मोतियाचा गजरा ’ बांधते. या ‘ प्रेमळ ’ स्वागतानं मैफिलीचा दरबारी दिमाख मनात भरतो. सभागृहाच्या वातावरणात चंदन, धूप, अत्तरं, गजरे यांचा संमिश्र सुगंध दाटून राहिलाय. सुमारे सातेकशे रसिकांची सभागृहात ठेचाठेच. सर्वांच्या चेहेऱ्यांवर उत्साह. पण विशेष जाणवणारं म्हणजे या अनोख्या कार्यक्रमाविषयीचं औत्सुक्य.

ठीक साडेनऊ वाजता एक सत्तरीचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व धीमी पावलं टाकीत व्यासपीठावर विराजमान होतं. हेच ते मराठी शायर ॲडव्होकेट भाऊसाहेब पाटणकर !

संयोजकांच्यावतीनं भाऊसाहेबांचा अल्पसा परिचय करून दिला जातो. आणि भाऊसाहेब बोलायला आरंभ करतात–

‘ मंडळी, तुम्हां पुणेकर रसिकांना माझी एकच विनंती राहील की मी आपल्यासमोर आज जे काही सादर करणार आहे त्याला ‘ दाद ’ देताना कृपया संयम पाळू नका. मोकळे रहा. अर्थात आपण दाद द्याच असा माझा आग्रह नाही पण मी आपणास नम्रपणे सांगू इच्छितो की मी आपली दाद आपल्या स्वाधीन ठेवलेली नाही. आपली मनं प्रसन्न करणं ही माझी

जबाबदारी पण मनापासून आलेला प्रतिसाद ओठाबाहेर आणण्याची जबाबदारी आपली.'

स्वत:च्या कार्यक्रमाविषयी भाऊसाहेबांना वाटणारा आत्मविश्वास पाहून रसिकांची उत्सुकता शिगेला पोहोचते. मुख्य कार्यक्रमाला आरंभ करण्यापूर्वी श्रोत्यांची 'नाडीपरीक्षा' घेण्यासाठी ते आपला सूर्यावरचा एक अफलातून शेर सांगतात अन् पहिल्याच फेरीत समस्त रसिकांना 'चीतपट' करतात. सर्वांच्या मुखातून एकदम 'वाहवा'चा दिलखुलास कोरस बाहेर पडतो. या नाडीपरीक्षेत श्रोत्यांची प्रकृती एकदम 'ठणठणीत' असल्याचं, सगळ्यांची हृदयं 'जिवंत' असल्याचं ते ताडतात आणि कार्यक्रमास आरंभ करण्यासाठी आपली बैठक जमवतात. श्रोतेही उत्सुकतेने पुढे सरकतात. कार्यक्रमास सुरुवात होते.

'आपल्या विकलतेच्या सौंदर्यावर प्रेम करणारा प्राणी म्हणजे माणूस' अशी माणसाची अभिनव व्याख्या करून 'अंतरीच्या यातनांना शिल्पात गोठवून ठेवणाऱ्या शहाजहानच्या शिल्पाप्रमाणेच आपणही शायरीचं हे 'शब्दशिल्प' कसं उभं केलं आहे' हे सांगून ताजची चारुता जेवढी मोहक तेवढीच माझ्या शायरीची आहे असं ते म्हणतात. ताजप्रमाणेच येथेही 'कोण्यातरी मुमताजची स्मृति अंतरी आहे.' ताज यमुनेकाठी उभा आहे तर येथे यमुनेसवे गंगाही नयनातून वाहत आहे. 'बादशहाप्रमाणेच मीही माझ्या कल्पनांच्या गगनचुंबी मनोऱ्यावर उभा राहून एका वेड्या आशेत आस्मान शोधतो आहे.' भाऊसाहेबांनी आपल्या शब्दशिल्पाची ताजमहालशी केलेली ही तुलना बहारीची व अभिनव वाटते. शायरीच्या अशा आकर्षक प्रस्तावनेनंतर 'इष्क किंवा श्रृंगार' या विषयाच्या शायरीला आरंभ होतो.

भाऊसाहेबांच्या इष्कविषयक कल्पना इतरांपेक्षा फारच वेगळ्या आहेत. प्रथम ते उर्दू काव्यातील इष्कविषयक कल्पना संकेत काय आहेत ते काही उर्दू शेरांच्या आधारे सांगतात आणि त्या पार्श्वभूमीवर मराठी माणसाच्या प्रणयाविषयीच्या कल्पना अपेक्षा किती भिन्न आहेत हे आपल्या शायरीच्या आधारे स्पष्ट करतात. श्रृंगारात त्यांना संयम प्रिय वाटतो. प्रणयातील वैफल्यातूनही ते 'बर्बाद' न होता अध्यात्माचा, वैराग्याचा मार्ग धरतात.

इष्कानंतर हया किंवा लज्जा, नजाकत, गम किंवा व्यथा इत्यादी विषयांवरील शायरी होते. त्यांच्या नायिका दुसऱ्याने टाकलेल्या नेत्रकटाक्षांच्या

भारानेही वाकतात इतक्या त्या नाजूक आहेत. त्यांची नाजूकता जाणून त्यांच्या पायाखाली विकल हृदयांच्या पायघड्या घातल्या आम्ही, पण त्या इतक्या नाजूक की आमची हृदयं तुडवून त्या केव्हा गेल्या हे आमचं आम्हांलाच कळलं नाही.

यानंतर आरंभ होतो कल्पनारम्य शायरीला. यात अभिनव कल्पनांच्या प्रचंड भराऱ्या आहेत. पाटणकरांच्या शब्दरूपी ताजमहालमधील हे एक मनोहर उपवन. चमत्कृतींनी भरगच्च भरलेली मयसभाच ! ही शायरी पेश करताना अफाट कल्पनांच्या रंगीबेरंगी रेशीमलडा उलगडून ते रसिकांसमोर एक अद्‌भुत, बहुरंगी विश्व उभं करतात. रसिक त्यात अक्षरशः चक्रावून जातो. वाहवांनी अन् टाळ्यांनी सभागृह डोक्यावर घेतो. क्षणभर वाटतं या आनंदकल्लोळानं सभागृहाचं छत आकाशात उडून तर जाणार नाही ना !

विनोदी शायरीविषयी असंच. पाटणकरांच्या विनोदाची शैली नावीन्य-पूर्ण. त्यात बुद्धीची विलक्षण चमक दिसते. विनोदात ते कमालीचे मिस्किल होतात. खरं तर ते सगळ्याच विषयांकडे मिस्किलपणे बघतात. अगदी जीवन, वार्धक्य, मृत्यू, वेदांत असे गंभीर विषय हाताळतानाही ते स्वतः कधीच गंभीर होत नाहीत. मृत्यूसारख्या मन विषण्ण करणाऱ्या विषयावरील शायरीलाही लोक हसून व टाळ्या वाजवून दाद देतात हे भाऊसाहेबांच्या काव्याचं वैशिष्टच. किंवा शायरी या काव्यप्रकाराचंच हे वैशिष्ट्य.

या झिंग आणणाऱ्या मैफिलीत पाटणकर शृंगारापासून मृत्यूपर्यंत व विनोदापासून वेदांतापर्यंत रसिकांना अनेक विषयांकडे घेऊन जातात –अगदी सहज, नकळत. या तीन तासांतील प्रत्येक क्षण संस्मरणीयच ठरतो. एखाद्याला ही अतिशयोक्ती वाटेल. पण ही वस्तुस्थिती आहे. श्रोता कितीही गंभीर प्रकृतीचा असो, तो इथं बघता बघता पिसासारखा हलका होऊन तरंगू लागतो, सहज मैफिलीत सामील होतो, बोलता होतो अन् दाद देऊ लागतो. या मैफिलीतला दाद न घेतलेला एकही शेर आम्हांला आढळला नाही.

भाऊसाहेबांचं उमदं व्यक्तिमत्त्व, जीवनाचा प्रदीर्घ अनुभव, विषयांचा गाढा अभ्यास, कुशाग्र बुद्धिमत्ता, मिस्किल निवेदन, स्वच्छ, सुसंस्कृत वाणी या सर्वांमुळं त्यांचं साधं बोलणंही ऐकत राहवंसं वाटतं. गेल्या वीस वर्षांच्या

खडतर परिश्रमानंतर त्यांची शायरी आता एखाद्या मंत्राप्रमाणे ‘सिद्ध’ झाली आहे. त्यांच्या पेशकारीतील अभिनिवेष एखाद्या पंचविशीच्या तरुणासारखा आहे. भाऊसाहेब वृद्ध आहेत हे तर्कानं ओळखावं लागतं जाणिवेनं नव्हे. त्यांची मैफिल ऐकणं हा घेण्यासारखा अनुभव आहे हे निश्चित. या कार्यक्रमाच्या जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे ऐकणारे खरोखरीच भाग्यवान. शनिवारची ही मैफिल या सर्व दृष्टीने खरोखरीच संस्मरणीय ठरली.

हा कार्यक्रम पुण्याच्या पेरूगेट भावेस्कूलच्या १९५८ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केलेल्या काही माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या उत्पन्नाचा विनियोग शाळेतील काही दिवंगत शिक्षक, विद्यार्थी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गणित, विज्ञान, क्रीडा इत्यादी क्षेत्रांत नैपुण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गौरवार्थ केला जाईल. तसेच काही अपंग विद्यार्थ्यांनाही या उत्पन्नातून आर्थिक, शैक्षणिक साहाय्य मिळेल.

□□□

दिवाकर बुरसे
२१२ कसबा पेठ
पुणे ४११ ०११

# निवेदन

मराठी काव्यात दिसून येणारी रूक्षता, नीरसता, दुर्बोधता आणि कल्पना-शून्यता मनाला सारखी टोचत होती. याउलट उर्दू शायरीतील मोहिनी मनाला बेधुंद करीत होती. मराठी काव्याला जर काही वेगळे रूप दिले नाही; त्यात जर जीवनाची धुंदी दिसली नाही आणि अत्यंत आकर्षक अशा सौंदर्याचा आविष्कार जर या काव्यात आढळणार नाही तर उर्दू शायरीची 'नखरेल नार' आमचा काव्यरूप संसार उध्वस्थ केल्याशिवाय राहणार नाही अशी मला साधार भीती वाटत होती.

'चौदहवी का चाँद' किंवा 'अब क्या मिसाल दूं' सारख्या काव्यपंक्तीं-खेरीज आज कोणत्या काव्यपंक्ती आमच्या तरुण पिढीच्या जिभेवर आहेत? तरुण पिढीला उगीच नावे ठेवणे मला पसंत नाही. वरील काव्ये उत्तान शृंगाराची खात्रीने नाहीत आणि आमची तरुण पिढी मुळीच बहकलेली नाही. या तरुण मनाला ज्या सौंदर्याची तहान लागली आहे ती भागवण्याचे सामर्थ्य आमच्या काव्यात नाही एवढेच मी म्हणेन.

मराठी काव्यावरील या माझ्या विधानाचा पुष्कळांना राग येईल हे मी जाणतो. पण तसे झाल्यास एका असाहित्यिकाचे हे विधान आहे असे समजून विद्वानांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करावे एवढेच मी म्हणेन. मला काय दिसते आहे एवढेच मी सांगत आहे. काव्य विषयाबद्दल असाहित्यिकाचा असा एखादा दृष्टिकोनही विद्वानांच्या कानावर असावा एवढेच मला वाटते. आमच्या काव्यसृष्टीकडे मी कसा बघत आहे हे मी नम्रपणे नमूद करीत आहे. काव्यातल्या या रूक्षतेची जाणीव आमच्या कविवर्गालाही नव्हती असे नव्हे. ही रूक्षता काढून टाकण्याचे खूप प्रयत्न केले गेले. त्यातूनच भाव-गीतांची उत्पत्ती झाली असे मला वाटते. काव्यातील अंतर्गत सौंदर्याची उणीव आता सुंदर चालीने किंवा एखाद्या गायिकेच्या गोड आवाजाने भरून काढण्याचा प्रयत्न सुरू झाला. अपवादात्मक अशी काही भावगीते वगळल्यास आमच्या आधीच असलेल्या काव्यदोषात आणखी एका दोषाची– स्त्रैणपणाची भर पडली. भावगीतेही आकर्षक होईनात तेव्हा आमचा कविवर्ग आणखी घाबरल्यासारखा झाला. त्याने अत्यंत दुर्बोध अशा काव्यनिर्मितीला सुरुवात

केली आणि त्या ऐटीत आमच्यासारख्या असाहित्यिकाच्या बुद्धिमांद्याला तो आता निःशंकपणे हसू लागला. काही केले तरी काव्यामध्ये हवे ते सामर्थ्य आणि सौंदर्य उत्पन्न झाले नाही.

किं कवेः तस्य काव्येन किं कांडेन धनुष्मतः ।
परस्य हृदये लग्नम् न घूर्मयति याच्छिरः ।।

या पंक्तीत वर्णन केलेला काव्यप्रकार निर्माण करता आला नाही. तेच जे आपल्या काव्याला साधले नाही तेच नेमके उर्दू काव्यात लीलेने साधले आहे. श्रोत्यांकडून सहजोत्स्फूर्त प्रतिसाद मिळविण्याचे हे सामर्थ्य नक्की कशात आहे याचा विचार केला गेला नाही. उर्दू काव्यात हे सामर्थ्य आहे आणि त्यामुळेच मैफिल रंगून जाते ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. कुठे मुशायरा आणि कुठे आमची कविसंमेलने ?

मराठी कविसंमेलनात दिसून येणाऱ्या या प्रतिसादशून्यतेला दुर्दैवाने मराठी श्रोतेच जबाबदार धरले गेले. काव्यातील सौंदर्यहीनतेवर पांघरूण घालण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. तसेच काहीच नसता प्रतिसाद देण्याची उर्दू श्रोत्यांना सवयच आहे असा त्यांच्यावर आरोप करून उर्दू काव्य हे मराठी काव्यापेक्षा सुंदर नाही अशीही समजूत निर्माण करण्यात आली. वास्तविक पाहिले असता असे मुळीच नाही. मुळात जर सौंदर्य असेल तर त्याचे स्वागत करण्याकरिता उर्दू भाषिकाइतकाच मराठी भाषिकही अधीर असतो हा माझा अनुभव आहे. श्रोत्यांमधील रसिकतेबद्दल एकदा हे मत गृहीत धरल्यास आमच्या काव्यात काहीतरी कमी आहे हे मानणे प्राप्त आहे. उर्दू काव्यातील हा सौंदर्यविशेष प्रथम कै. माधवराव पटवर्धन यांच्या लक्षात येणे स्वाभाविक होते.

ते सौंदर्य मराठी काव्यात उतरविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. या प्रयत्नाच्या अपयशाकडे लक्ष न देता केवळ त्या प्रयत्नावरच खूष होऊन मी त्यास पहिला मानाचा मुजरा करून माझे पहिले 'मराठी शायरी' हे पुस्तक त्यांच्या स्मृतीसच अर्पण केले. साहित्याच्या क्षेत्रात कौतुक करण्याची ही रीत असते. एखाद्या काव्याचे यशापयश दैवाधीन असते. कधी कधी काव्यनिर्मितीच्या मागे असलेला कवीचा उद्देशही आदरार्ह असतो. मराठी भाषेत तेच सौंदर्य निर्माण करीन या माधवरावांच्या

महत्त्वाकांक्षेसच आम्ही पहिल्याने प्रमाण केला आणि त्यांचीच जिद्द उराशी बाळगून या काव्यपरिश्रमास सुरुवात केली.

कै. माधवरावजींचे हे परिश्रम यशस्वी तर झाले नाहीतच; पण त्याचा एक वाईट परिणाम झाला. कै. माधवरावांसारखा सहृदय आणि प्रज्ञावंत या प्रकारात अपयशी ठरल्याबरोबर अशा प्रकारच्या काव्यनिर्मितीला मराठी भाषाच असमर्थ आहे असा भ्रम उत्पन्न झाला. इतरही कवींनी उर्दू काव्यातील गझलसारख्या वृत्तांचा अंगिकार करून पाहिला. पण उर्दू काव्याची लज्जत त्यात येऊ शकली नाही. मराठी भाषेच्या असामर्थ्याचा हा दुसरा पुरावा मानला गेला. उर्दू शायरीचे मराठीतील अनुवाद आपण वाचतो. हा मराठी अनुवाद उर्दू अनुवादित शेराच्या मानाने नीरस वाटतो— हाही मराठी भाषेतील वैगुण्याचा तिसरा पुरावा म्हणून स्वीकारण्यात आला.

मराठी भाषेवरील हे आरोप प्राणपणाने नाशाबीत करणाऱ्या अशा सामान्य माणसाची दखल काही वेगळ्यारीतीने घ्यावयाला हवी होती असे म्हटल्याशिवाय मला राहवत नाही.

साहित्यिकांकडून या काव्याबद्दल काही आस्थेने विचारपूस होईल असे मला वाटले होते. मराठी काव्यातला हा एक नवीन ढंग दिमाखाने आणि आत्मविश्वासाने आविष्कृत करणाऱ्या माणसास उपेक्षेशिवाय खात्रीनेच काही जास्त मिळावयास हवे होते.

मराठी विद्वानांबद्दल तर बोलायलाच नको. उर्दू शायरीची वारेमाप स्तुती करण्यात रंगून गेलेले हे विद्वान मराठीच्या या भ्रमाचाच एक प्रकारे पुरस्कार करू लागले. सामान्य मराठी भाषिक मराठी भाषेतील या दैन्याला मान्यता देऊन आपल्या सौंदर्याची तहान भागविण्याकरिता उर्दू काव्याकडे बघू लागला. त्याचे दृश्य स्वरूप म्हणजेच आमच्या तरुण पिढीला वाटणारे उर्दू काव्याचे आकर्षण होय. हा सर्व भ्रमनिरास नुसती व्याख्याने देऊन झाला नसता. याला प्रत्यक्ष कृती हवी होती. शायरीची निर्मिती करून मराठी भाषेत तितकाच जोम आहे, मराठी प्रतिभा ही तितकीच रम्य आहे, मराठी हृदय तितकेच ' जिंदादिल ' आहे आणि मराठी श्रोता सौंदर्याचे स्वागत करण्याला तितकाच उत्सुक आहे हे दाखवून देणे एवढेच माझ्या परिश्रमाचे प्रयोजन होते. मी साहित्यिक नव्हे; आणि या क्षेत्रात फार दिवस राहण्याइतकी साहित्यिकांची

सृष्टी आकर्षक आहे असे मला वाटत नाही. तरीही अशा सृष्टीत मला जो काही पाहुणचार मिळाला तसा फार थोड्यांच्या भाग्यात असतो.

एखाद्या सुंदर कलाकृतीची उपेक्षा करण्यापलीकडे साहित्यिक किंवा साहित्यसभा यांचे काही वेगळे अवतारकार्य आहे असे मला वाटत नाही. याबद्दल मला तिळमात्र खेद नाही. मराठी भाषिकांतील काही एका विशिष्ट पातळीतील लोकांचा हा स्वभावविशेष आहे हे न समजण्याइतका मी वयाने लहान नाही. मोठमोठ्या वाघांशी आमना सामना शिकार करून जेव्हा तो मृत वाघ यवतमाळला आणला जाई तेव्हा अशा धाडशी शिकारीबद्दल साधी विचारपूसही न करण्याचा संयम आमच्या 'बाररूम' मधील शेकडा नव्वद वकील दाखवीत असत. अशी विचारपूस करण्यात आपल्याला शिकाऱ्याच्या धैर्याची दखल घ्यावी लागेल ही त्यांना भीती वाटत असेल; पण हा पांढर-पेशा वर्ग सोडल्यास आम जनता या शिकारीबद्दल सादर कौतुक दाखवीत असे. मला तोच अनुभव साहित्याच्या क्षेत्रात साहित्यिकांबद्दल आला. हे मी नमूद करण्यात मला याबद्दल विशेष वाटते असे नव्हे. याची जाणीव मला अगोदरपासूनच होती; आणि एवढ्याचकरिता माझ्या शायरीचे कदरदार म्हणून मी फक्त दोघांकडेच दृष्टी लाविली होती.

मला विश्वास होता की साहित्यसमीक्षक याची कदर करतील. त्याच प्रमाणे सामान्य श्रोते या काव्यप्रकाराचे स्वागत करतील ही मला खात्री होती. माझी अपेक्षा अक्षरशः माझ्या बंदुकीच्या नेमाइतकीच अचूक होती. वर वर्णन केलेल्या साहित्यिकांनी माझा मुळीच अपेक्षाभंग केला नाही; कारण त्यांकडून मला अपेक्षाच नव्हती. आणि जी होती ती सफलच झाली असे मी म्हणेन. मराठी भाषेत शेरोशायरी तितकी रमणीय वाटत नाही अशा तऱ्हेचे विधान एखादा विद्वान करून जाण्याचा संभव आहे, हे मीही जाणून होतो. मराठी भाषेच्या या असामर्थ्याचा उल्लेख करणारा एक बहाद्दर निघाला. माझ्या पुस्तकावर आलेल्या परीक्षणांकडे मी फार लक्षपूर्वक बघत असे. आणि या सर्व परीक्षणांकडे पाहून मला अतिशय संतोष वाटला. सुंदर कलाकृतीचे स्वागत करावयास उत्सुक असलेला एवढा विशाल महाराष्ट्र पाहून कोणाला आनंद वाटणार नाही ? मराठी भाषेवरील या असामर्थ्याच्या विधानाला प्रत्यक्ष मराठवाड्यातच कार्यक्रम करून मी उत्तर दिले आहे. उर्दू भाषा समजणारेच नव्हे तर उर्दू काव्यात आकंठ निमज्जन

करणाऱ्या श्रोत्यांकडून मिळालेली साद हे वरील विधानाला समर्पक उत्तर आहे.

मराठी भाषेत शेरोशायरीला आवश्यक असा जोम आहे किंवा नाही, हा आता वादाचा प्रश्न उरला नाही. मराठी भाषेचे हे सामर्थ्य जर वादातीत आहे तर मराठी भाषेत हा प्रकार का निर्माण झाला नाही किंवा का यशस्वी झाला नाही एवढेच संशोधन करून पाहण्यासारखे आहे. हा काव्यविशेष म्हणजे नक्की काय आहे याची सुस्पष्ट कल्पना कवींना झालेली नव्हती असे मी नम्रपणे म्हणेन.

शेवटी कोणीतरी या काव्य-विशेषाबद्दल व्याख्या करणे जरूर आहे. ती एकदा करून बघितल्यावर मराठीतही तसा प्रकार आणण्यास आवश्यक ते सुस्पष्ट ज्ञान होईल. मी या काव्यविशेषाची खालीलप्रमाणे व्याख्या करतो :

भावोन्मादोत्थित कल्पना चमत्काराविष्कार विशेष शायरी।
कल्पना चमत्कृतित्वंतु विस्मय सहकृत सदभिव्यजकत्वं ।।

उत्कट भावनेतून निर्माण झालेल्या सद्भिव्यंजक अशा विस्मयकारक कल्पनेच्या आविष्काराचे एक तंत्र असा मी वरील व्याख्येचा सामान्यतः अर्थ लावतो. वरील लक्षण तंतोतंत लागू पडणारा हा जफरचा शेर पहा :

उन हशरतोंसे कह दो कहीं और जा बसे।
इतनी जगे कहा है दिल दागदार में ।।

दरवेळी निराशेने व्यथित झालेल्या हृदयाला आता एखादी नवीन आशाही करणे किती कठीण असते, हे सत्य किती रम्य कल्पनेच्या आधारे सांगितले आहे ते बघा.

वरील व्याख्येत मी रचना तंत्रावर जोर दिला आहे हे आपल्या लक्षात येईल.

शायरीचे खरे सौंदर्य जसे विस्मयकारक कल्पना-वैभवात आहे तसेच ते रचना-तंत्रातही आहे. प्रतिभेची देणगी ही परमेश्वराची देणगी आहे. तिच्याबद्दल ऐट मानणे चुकीचे आहे. एखादा अतिसामान्य शायरही एखाद्या प्रसंगी शायरश्रेष्ठ गालिबलाही कसा मागे टाकील याचे उदाहरण मी एका व्याख्यानातून दिलेले होते. हे वरील तंत्र जरी सांभाळले तरीही शायरीची

लज्जत उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाही. हे तंत्र नसल्यास उत्कृष्ट कल्पनाही तितकी हृदय खेचून घेणारी होत नाही. या तंत्राचा अवलंब केल्यास काय होते ते बघा. कविवर्य श्री. मनमोहन नातू यांच्या एका सर्वश्रुत काव्य-पंक्तीस मी शेरोशायरीची वेषभूषा देत आहे. ही देण्यात मी मूळ भावार्थ किंवा अभिप्राय मुळीच बदलत नाही. राधेची मैत्रीण विनोदाने राधेला हा प्रश्न विचारते–

कसा ग बाई झाला, कुणी ग बाई केला,
राधे तुझा सैल अंबाडा

वेषभूषा बदलून उर्दू वेषातला हा शेर पहा :

सांग वा सांगू नको, सारे अम्हाला समजतें
सैल व्हाया केंस, कांहीं और व्हावें लागतें.

हे तंत्र न साधल्यामुळे कै. माधवरावजी शेरोशायरीत यशस्वी होऊ शकले नाहीत. अखेरपर्यंत काही समजू न देता विस्मयकारक रीतीने शेवटच्या चरणार्धात सत्याचा स्फोट करणे हे एक तंत्र शेरोशायरीत सांभाळावे लागते. उर्दू काव्याचे सौंदर्य याच लहानशा साध्या गोष्टीत आहे. हेच माझे संशोधन आहे. काव्यात इतरही काव्यगुणांचा आविष्कार असावा लागतो हे खरे; पण या तंत्रावरच शायरीचे सर्व बल अवलंबून आहे. हे तंत्र न साधल्या-मुळेच मराठी अनुवादित शेर नीरस दिसतात. आणि यामुळेच उर्दू काव्याच्या तुलनेने आमचे काव्य दिलखेचक वाटत नाही. आणि दुर्दैवाने मराठी भाषेवरच वर सांगितल्याप्रमाणे आरोप केले जातात. तंत्राइतकाच दुसरा महत्त्वाचा शायरीतील काव्यगुण म्हणजे अर्थसुलभता होय. आणि त्यामुळेच सामान्य श्रोत्यापासून तो विद्वानांपर्यंत हे काव्य सर्वांनाच आकर्षक झाले आहे.

यानंतर एका गोष्टीचा उल्लेख करून मी हे निवेदन संपवीत आहे. शायरी काव्यप्रकाराची एकदा वर सांगितल्याप्रमाणे व्याख्या ठरविल्यास ती व्याख्या लागू पडेल अशी सुंदर काव्यसंपदा आपल्या संस्कृत वाङ्मयात आहे. हे खरे की त्या काळात आत्मनिष्ठ काव्याचा तितकासा आदर नव्हता. पण शेरोशायरी हे केवळ वैषयिक काव्य नव्हे. या काव्याचा कोणताही विषय असू शकेल. भावनेच्या पार्श्वभूमीवर सत्याभिव्यंजक कल्पनेचा विकास म्हणजे शायरी होय.

संस्कृतातील शायरी-सदृश काव्याचे मी नमुन्याकरिता खालील उदाहरण देत आहे :

भुक्ते मयि प्रथमत्सि फलानि वत्स
सुप्ते करोषि शयनं मयि जीवति त्वं ।
प्राणान् जहासि सुरलोक सुखाय किं वा
सापत्न भाव महह प्रकटीकरोषि ॥

अशी अनेक उदाहरणे देता येतील. ज्ञानेश्वरीसारख्या काव्यात तर तुम्हांला पदोपदी शायरीच वाचतो असा भास होईल. तुळशी रामायणातही या काव्यप्रकाराची अनेक उदाहरणे देता येतील. ही गोष्ट खरी, की केवळ याच प्रकाराच्या पाठीमागे आमचे प्राचीन कवी लागले नाहीत; पण त्यांनी हा प्रकार खात्रीने हाताळला आहे. हे सर्व विवेचन व्याख्यानाव्यतिरिक्त करता येणे शक्य नाही. मी तर असे म्हणेन की शायरी या काव्यप्रकाराचे जनकत्व प्राचीन संस्कृत कवींकडेच आहे.

'मराठी शायरी' आणि 'मराठी मुशायरा' या दोन्ही पुस्तकांत मराठी हा शब्द मी भाषेच्या दृष्टीने न वापरता संस्कृतीच्या अर्थाने वापरला आहे. मराठी शायरी म्हणजे मराठी भाषेत शायरी निर्माण करणे नव्हे. ज्या संस्कृतीत आमचा पिंड वाढला आहे त्याच संस्कृतीचे विश्व आपण येथे बघाल. उर्दू काव्यातील विश्वाहून आमचे विश्व वेगळे आहे. आणि म्हणूनच मय, कदा, साकी, सैयाद, कफस, शमा, परवाना या विश्वाला मी माझ्या काव्यात स्पर्शही केला नाही.

या प्रतीकांशिवायही आमच्या विश्वात काही वेगळे सौंदर्य आहे. काही उल्लू शेरोशायरी सोडल्यास आपणास सगळीकडे मराठी भाषिकाचेच सांस्कृतिक विश्व दिसेल. शायरी काव्यप्रकारात प्रयत्न करणाऱ्या माझ्या सर्व तरुण मित्रांना मी एवढेच सांगेन की, हा प्रकार हाताळताना गुलामगिरीचा स्वीकार करू नका. तुमच्या भाषेबद्दल अभिमान बाळगा. तुमच्यात हवी तितकी 'जिंदादिली' आहे. तुमच्या भाषेत हवा तितका जोष आहे. तुमच्या प्रतिभेत सामर्थ्य आहे, इतकेच नव्हे तर या काव्यप्रकाराचे जनकही तुम्हीच आहात.

**भाऊसाहेब पाटणकर**

## शायरी रसिकांसाठी थोडेसे–

उन्मेष ज्यांच्या यौवनाचा, काहीच ना झाला कमी
प्यायले जे खूप, ज्यांना वाटे, परी झाली कमी
निर्मिली मी, फक्त माझी, त्यांच्याचसाठी शायरी
सांगतो इतरास, ' बाबा, वाचा सुखे ज्ञानेश्वरी '

अंतरीच्या यातनांना, अमरता द्याया इथे
शायरीचा ताज मीहि, निर्मिला आहे इथे
स्पर्शून त्या शिल्पास तेथे, यमुनाच नुसती वाहते
यमुनेसवे नयनातुनी, गंगाहि येथे वाहते

चारुता तैसीच आहे, आहे जशी त्या ताजची
आहे स्मृतीही अंतरी या, कोण्यातरी मुमताजची
विरहातले सौंदर्य जेव्हा, कोठे कधी साकारते
साकारते शिल्पात, तैसे शब्दातही साकारते

शिल्पात या रत्ने अम्हीही, जागजागी जडविली
इष्कातल्या अनमोल माझ्या, साऱ्या स्मृतींची जडविली
कल्पना रंगावली, रेखिली आहे अम्ही
भावकुसुमे रंगवीली, विविध रंगांनी अम्ही
शिल्पापरी त्या शिल्प हेही, रम्य आहे आमुचे
इतकेच की ते दृश्य आहे, श्राव्य आहे आमुचे

मी ही मिनारी उंच माझ्या, कल्पनांच्या या अशा
शोधतो आस्मान, काही, आशेत या वेड्या अशा
व्यर्थ ना हे उंच इतुके, उभविले मीनार मी
वाटले, त्या अप्सरेला, इथुनी तरी पाहीन मी

हे खरे, नाही कुठेही, येथून ती दिसली मला
हे ही खरे की, खेद याचा, काही जरा झाला मला
ऐसे जरी, संतोष आता, मानतो इतुकाच मी
दूरपण माझे तिचे, इतुके तरी झाले कमी

निर्मूनिया हे शिल्प झालो, अंति असा ऊद्विग्न मी
वाटले की व्यर्थ श्रमलो, निर्मिण्या हे शिल्प मी
असता खरा संतोष मजला तेंव्हाच काही अंतरी
केंव्हातरी तीही जरी का, पाहुनी जाती तरी

दोस्त हो, आम्ही स्वये, हा ताज आहे उभविला
नाही तसा दुसऱ्या कुणाच्या, आम्ही श्रमाने उभविला
सौंदर्य तर त्याहून जास्ती, साधता आले अम्हा
मौज ही, याचा जराही, खर्च ना आला अम्हा

आसवे नयनात जर या, निर्मिली नसती कुणी
नावही या शायरीचे, ऐकिले नसते कुणी
ज्यांनी दिला हा दर्द, नयनी आसवेही निर्मिली
मी नव्हे, ही शायरीहि, त्यांनीच आहे निर्मिली

सांगेल काही भव्य, ऐशी शायरी माझी नव्हे
तो कवींचा मान, तितुकी, पायरी माझी नव्हे
आम्ही अरे, साध्याच अपुल्या जीवना सम्मानितो
सम्मानितो हासू तसे, या आसवा सम्मानितो
जाणतो अंती अम्हाला, मातीच आहे व्हायचे
नाहीतरी दुनियेत दुसरे, काय असते व्हायचे ?
मानतो देवासही, ना मानतो ऐसे नव्हे
मानतो इतुकेच की, तो आमुचा कोणी नव्हे

आहो असे बेधुंद, अमुची धुंदही साधी नव्हे
मेलो तरी वाटेल मेला, दुसरा कुणी, आम्ही नव्हे

सन्मानिले वैराग्य आम्ही, श्रृंगारही सन्मानिला
अंकावरी आहे रतीच्या, बुद्ध येथे झोपला
विसरला दुनियेस, अपुल्या गुंजनाही विसरला
कमलकोषी भृंग आता, कमलासही त्या विसरला
हे हवे वैराग्य आम्हा, निष्कामता ऐसी हवी
तैसी नको, नुसतीच जेथे, दाढी हवी, लुंगी हवी

(शायरश्रेष्ठ गालिबला लाभलेली कीर्ती आमच्याही वाटयास येईल पण...)

गालिब, अरे, आमुच्याहि दारी, आहेच कीर्ति यायची
फक्त आहे देर थोडी, मरणास अमुच्या यायची
येणार ना अमुच्या पुढे ती, प्राण असती तोवरी
कीर्ती प्रिया माझी अरे, ही भलतीच आहे लाजरी

दुर्लक्षिले जेव्हा अम्हीहि, साहित्यिकांना या अशा
मैफिलीहि जागजागी, रंगल्या जेंव्हा अशा
तेंव्हा कुठे कीर्तिप्रियाही, हासुनी आली पुढे
नुसतीच ना आली तशी, गालही केला पुढे

सांगूच का साहित्यिकांना, काय या नक्की हवे
नुसते नको साहित्य, यांना काही तरी जास्ती हवे
सम्मानिले असते अम्हाही, इतुके जरी असते तरी
असते कुठे शेपूट, नुसता शेपटा असता तरी

दोस्त हो, तो शेपटाही, लावला आणून मी
ऐसे नव्हे गंगावनाची, आता तरी आहे कमी

आता तरी वाटे उपेक्षा, नशिबात या माझ्या नको
कळते अता, साहित्यिकांना, शेपटा नुसता नको

शायरी ऐकून माझी, सांगेल जो आता पुरे
तो रतीच्या चुंबनाही, सांगेल की आता पुरे
तोंडही भगवन, अरे, त्याचे मला दावू नको
ना जरी मंजूर हे ही, माझे तया दावू नको

□□□

# शृंगार

हसतील ना कुसुमे जरी, ना जरी म्हणतील ‘ये’
पाऊल ना टाकू तिथे, बाग ती अमुची नव्हे
भ्रमरापरी सौंदर्यवेडे, आहो जरी ऐसे अम्ही
इष्कातही नाही कुठे, भिक्षुकी केली अम्ही

खेळलो इष्कात आम्ही, बेधुंद येथे खेळलो
लोळलो मस्तीत, नाही पायी कुणाच्या लोळलो
अस्मिता इष्कात साऱ्या, केंव्हाच नाही विसरलो
आली तशीही वेळ, तेंव्हा इष्क सारा विसरलो

रडलो अम्ही इष्कात, जेंव्हा, आम्हा रडावे वाटले
तेंव्हा नव्हे, इष्कास जेंव्हा, आम्ही रडावे वाटले
आसूवरी अधिकार हाही, इष्कात ज्याला साधला
नुसताच नाही इष्क, त्याला मोक्ष आहे साधला

बर्बादिची दीक्षा जशी, इष्कात आम्ही घेतली
इष्कही बर्बाद करण्या, माघार नाही घेतली
ना रडू नुसतेच आम्ही, हाय ना नुसते करू
आहो शिवाचे भक्त आम्ही, हे ही करू, ते ही करू

नव्हता तसा केविलवाणा, इष्क केव्हा आमुचा
होता पुरे प्रणयात सारा, नुसता इशारा आमुचा
दोस्त हो, या अप्सरांनी नाही अम्हाला रडविले
रडविले जे काय अमुच्या, संयमाने रडविले
हे खरे, आहो अम्हीही, इष्कात या रडलो कधी

रडलो असे इष्कात, नाही नयनासही कळले कधी

(इष्कातले वैफल्य आम्हांला तरी अध्यात्माची ओढ लावते)

सारखा होता पुढे, चेहरा हसरा तिचा
होतो अशा मस्तीत, जैसा वेणीतला गजरा तिचा
प्राशुनि बेधुंद होतो, मदिरा तिच्या अधरातली
नव्हतो जसा दुनियेत, होतो कल्पवृक्षाच्या तली
चांदणे नुसतेच होते, जीवनी या पसरले
वाटले दुर्दैव जैसे, साफ मजला विसरले
अर्थ दुसरा जीवनाचा, कळलाच ना मजला कधी
आज जो कळला तसा, ना कळो कोणा कधी

नजरही ज्यांच्यावरोनी, वाटले काढू नये
वाटते की आज त्यांचे, नावही काढू नये
दोस्त हो, इष्कात साऱ्या हेच असते व्हायचे
हेही जरी ना व्हायचे, तर काय दुसरे व्हायचे ?
नुसताच नाही इष्क सारा, समजला आता मला
वैय्यर्थ साऱ्या जीवनाचा, समजला आता मला
ना कुठे गेलो, कुण्या साधूकडे ना पोचलो
नुसताच केला इष्क, आणि या पदाला पोचलो

जळलो असे इष्कात, जैसे कोळसे झालो अम्ही
सागरी आता भवाच्या, बुडणारही नाही अम्ही
समजू नका, कोणास काही भलते कधी सांगेन मी
उतरावया भवपार नुसता, इष्कही नाही कमी

(अखेर आमच्या इष्काचे विषय कोण होऊ शकते)

मानु अम्ही की इष्क अमुचा, त्यांनाच आहे समजला

नजरेतला या भाव ज्यांना, ना पाहताही समजला
कौशल्यही या अभिनयाचे, काय मी सांगू तिच्या
भावही या समजण्याचा, वदनावरी नव्हता तिच्या

लपविली होती जरी का, प्रणयार्तता मी आमुची
आले तिच्या नजरेस कोठे, नजर होती आमुची
शालीनता सांभाळुनीही, सम्मानिले आम्हा तिने
निखळत्या पदरास नाही, स्पर्शही केला तिने

संमती ज्या कुशलतेने, होती तिने आम्हा दिली
कुशलतेने त्याच मीही, जाहीर ना होऊ दिली
नुसतेच ना इष्कास अमुच्या, ऐसे तिने सम्मानिले
आमुच्या, अपुल्या स्वतःच्या, शीलासही सम्मानिले
त्यांशी करावा इष्क, ज्यांनी इष्कातही काही पुढे
ना टाकले, टाकू दिले, पाऊलही याच्यापुढे

दोस्त हो, दुसऱ्या क्षणी, तो इष्क आम्ही विसरलो
ऐसे जरी, ऐसे नव्हे की, एकमेका विसरलो
आग आहे इष्क, उपमा काय दुसरी द्यायची
पेटूनियाही यात नसते, राख होऊ द्यायची

□□□

# दर्द

आसूविना इष्कात आम्ही, काय दुसरे मिळविले
दोस्त हो, माझे असो, तेही तुम्ही ना मिळविले
आता कुठे नयनात माझ्या, चमकली ही आसवे
अजवरी यांच्याचसाठी, गाळीत होतो आसवे

रोखले नयनात आसू, मी शब्द ओठी रोखले
बघितले नाही तिला मी, नजरेस माझ्या रोखले
सांगूच का, या संयमाला, का असा मी सोसला
होती अम्हा जाणीव, आम्हा, इन्कार नसता सोसला

जे मिळाले त्यातही, धन्यता मानु अम्ही
केलास जो इन्कार, त्याचे दु:ख ना मानु अम्ही
ऐसे नव्हे, आम्हास आहे, इन्कार तू नुसता दिला
नसता दिला कोणीच ऐसा, दर्द तू आम्हा दिला
देऊनिया हा दर्द आम्हा, काय तू नाही दिले
नाहीतरी, याहून जास्ती, काय तू असते दिले ?
औदार्यहि तव अंतरीचे, काय मी सांगू तुला
देऊनिया हा दर्द, त्याची जाणीवही नाही तुला
इष्कातले सर्वस्व जैसे, आहेस तू आम्हा दिले
सांगू खरे, तेही खरे, काहीच ना देता दिले

नाहीतरी इष्कात होता, दर्द आम्हाला हवा
पाकळ्यांचे काय, त्यांचा गंध आम्हाला हवा
दर्द आहे साथ, आहे याचाच आता भरवसा
शुक्रिया हे अप्सरांनो, तुमचा कशाचा भरवसा

दुर्लक्षिले त्यांनी तरीही, काही अम्हा ना वाटले
तूही असे करशील मृत्यो, केंव्हाच नव्हते वाटले
होता तुझा विश्वास, वाटे दैन्य ना दावू कुणा
आसवे नयनातली या, कळणारही नाही कुणा
झालास तू त्यांचाच, अमुची नाही स्मृतीही राहिली
होती तुझी जी काय आशा, तीही कुठे ना राहिली
ओळखी यांची नवी, आम्हा नवा नाहीस तू
सोबती जन्मांतरीचा, आजचा नाहीस तू
हाय ! तू आहे तरीही, आम्हा असा धोका दिला
सांगना मृत्यो तुला, आहे कधी का मी दिला
जन्मांतरी ज्या ज्या क्षणी, मी दूत तुमचा पाहिला
हातचे टाकून आलो, मी स्वार्थ नाही पाहिला
दोष ना देऊ जरी, आहेस आम्हा विसरला
देवेंद्रही नादात यांच्या, इमान आहे विसरला
अप्सरांना त्याच आम्ही, आदाब केला शेवटी
मृत्यूवरीही, हाय माझ्या, त्यांचीच सत्ता शेवटी

तूं तरी या अप्सरांच्या, नादी असा लागू नको
सांगूच का, मृत्यो तुला मी, का असे म्हणतो नको
दुर्दशा अमुच्यापरी, ऐसी जरी आली तुला
कुठवरी रडशील वेडया, मरणही नाही तुला

□□□

## लज्जा

लाजायचे नव्हतेस, आम्ही नुसतेच तुजला बघीतले
वाटते की व्यर्थ आम्ही, नुसतेच तुजला बघीतले

उपमा तुझ्या वदनास त्याची, मीही दिली असती सुखे
थोडे जरी चंद्रास येते, लाजता तुजसारखे

येते तुझ्या स्वप्नात, मीही का म्हणू नाही तरी
पडदा जरी का तूं तिथेही, दूर ना केला तरी

जेंव्हा कधी या दर्पणी, माझे मला मी पाहिले
लाजले जैसे मला, दुसऱ्याच कोणी पाहिले
पडदा तरीही मी मुखाचा, काढून नव्हता घेतला
प्रत्येकदा त्या दर्पणाला, पडद्यात होता घेतला

नजरही नाही कुणाच्या, नजरेस मी केंव्हा दिली
दर्पणी आता जशी, नजरेस मी माझ्या दिली
नजरा परी जुळता तिथेही, मी लाजून खाली बघीतले
मी मला या दर्पणीही, नाही पुरेसे बघीतले

आहे जरी का आज, पडदा फेकुनी त्यांनी दिला
फेकता आलाच नाही, ईश्वराने जो दिला
आरोपिती आम्हास पडदा, आम्ही जसा त्यांना दिला
मानू अम्ही 'हो दिला, त्याने दिला, आम्ही दिला'

□□□

## लावण्य

पाहिले लावण्य नुसते, नाही तिला मी पाहिले
पाहूनही चंद्रप्रभेला, चंद्रास नाही पाहिले
भेटूनियाही भेट त्यांची, नशिबात नव्हती आमच्या
हाय ! हे सौंदर्य त्यांचे, आड आले आमच्या

सौंदर्यवलयातून त्यांची, दिसली जरा रेखाकृती
तेजातुनी अपुल्याच जैसी, सौदामिनीची आकृती
ऐसे जरी ऐसे नव्हे, नाही तिला मी पाहिले
गले दिपोनी नेत्र, आम्ही कल्पनेने पाहिले

□□□

# कुंतल

पेड वेणीचे तुझ्या तू, सोडू नको मागेपुढे
आम्ही तरी कैसे पहावे, सारखे मागेपुढे

वेणी नव्हे तो केस आहे, एक वेणीचा तुझ्या
सांग त्याला का नसावी, ओढ गालाची तुझ्या

बोललो नाही कधी, ना कधी बोलेनही
यातना मी काळजाच्या, साहिल्या साहीनही
माझे असो, या कुंतलांशी, माझ्यापरी वागू नको
आपल्या गालावरोनी, यांना तरी लोटू नको

जे तुझे त्यांचीच सारी, पाहून ऐसी दुर्दशा
वाटते काहीच नाही, माझी स्वतःची दुर्दशा
इष्कातले अपमान आम्ही, आता जरासे सोसले
जन्मभर या कुंतलांनी, हेच आहे सोसले

पेड वेणीचे नव्हे, जे वक्षावरी तूं सोडिले
रक्षिण्या धन यौवनाचे, नाग जैसे सोडिले
जाणतो प्राणाहुनिही, यांस तू सांभाळिसी
ना कळे आम्हासही, ही Dog in the manger Policy

(आता नुसता कल्पनाविलास बघा)

पाऊलही दारी तुझ्या, जाणून मी नाही दिले
जपलो तुझ्या नावास, नाही बदनाम तुज होऊ दिले
स्वप्नातही माझ्या जरी का, येतीस तू आधीमधी
स्वप्नही आम्ही कुणाला, सांगितले नसते कधी

वास्तवाच्या या जगीं, ना मीलनाची आसही
सोडुनि तूं स्वप्न माझे, कां इथे आलीस ही ?
वाटते की जीवनी या, काहीच नाही राहिले
स्वप्नातहि पण आज माझ्या, काहीच नाही राहिले

अजवरी नुसतेच होतो, स्वप्नात तुजला भेटलो
हे खरे की आज ऐसे, प्रत्यक्ष आहो भेटलो
हाय ! माझ्या दुर्दशेला, अंत नाही राहिला
आज या प्रत्यक्षतेचा, विश्वास नाही राहिला

ऐसी जरी स्वप्नात माझ्या, येऊनी गेलीस तू
मानेन की प्रत्यक्ष जैसी, भेटुनी गेलीस तूं
मानण्याचा प्रश्न नुसता, ते स्वप्न अन् ही जागृति
काय मोठे त्यात आम्ही, त्यालाच मानू जागृति

येऊनी तेथे अम्हा, ना भेटता गेलीस तूं
ऐकतो, स्वप्नात माझ्या, येऊनी गेलीस तूं
यातही उपकार आम्हा, कांही कमी ना वाटले
स्वप्नातही येशील ऐसे, स्वप्नात नव्हते वाटले

भीति तिला प्रणयात, कोणी पाहील याची वाटते
येऊनही स्वप्नात माझ्या, हेच तिजला वाटते
म्हणते कशी, कैसीतरी स्वप्नात या आले तुझ्या
आहेत पण सारेच बाई, भोवती जागे तुझ्या
जाणते सर्वांस यांना, मीहि नव्हे साधी तशी
स्वप्नातही येतील मेले, मी जशी आले तशी
भेटण्या जेंव्हा तिच्या, स्वप्नात मी गेलो तिथे
स्वप्नातही अपुल्या स्वतःच्या, हाय ! ती नव्हती तिथे

त्रास ऐशा अप्सरेला, हाच असतो सारखा
नेतो तिला उचलून जो तो, अपुल्याच स्वप्नी सारखा

ऐकले दुसऱ्या कुणाच्या, स्वप्नात ती आहे तिथे
बोलाविले नव्हते तरीही, धावुनि गेलो तिथे
आतातरी दुर्दैव वाटे, नक्कीच माझे संपले
पोचण्याआधीच तेही, स्वप्न त्याचे संपले

चिंतनी त्यांच्याच होतो, बागेत मी माझ्या इथे
ना कळे तीही कशी, बागेत या आली इथे
होता जरी का हट्ट त्यांचा, भेटू नये आम्हा कधी
चालला दैवापुढे का, हट्ट कोणाचा कधी
आणिली जुळवून दैवे, भेट त्यांची शेवटी
त्यानेच नेली बाग माझी, स्वप्नात त्यांच्या शेवटी

बघता तिला, तात्काळ मीहि, धावुनि गेलो पुढे
सांगेल का, सांगा कुणी, काय जे झाले पुढे
मीलनी होतो अशाही, धुंदीत त्या तेंव्हा अम्ही
संपून गेले स्वप्न याची, पर्वाही ना केली अम्ही

ओशाळलो पाहून सारे, लोक हसतांना अम्हा
तेंव्हा कुठे आली कळोनी, चूक ही अमुची अम्हा
होते जसे दुर्दैव माझे, मागेच माझ्या लागले
प्रणयातही स्वप्नातल्या या, बदनाम व्हावे लागले
दोस्त हो, तुम्ही तरी हा, बोध घ्यायाला हवा
संपण्याआधीच स्वप्ने, प्रणय संपाया हवा

आश्चर्य हे, आश्चर्य याचे काही तिला ना वाटले
वाटले जे काय माझ्या, ओशाळण्याचे वाटले

म्हणते कशी, हे स्वप्न अपुले, वाटे जरी का संपले
सांगते, या प्रेक्षकांचे, अद्याप नाही संपले
म्हणते पुन्हा, ही जागृति, जी वाटली तुजला खरी
वेड्या, अरे ती जागृतीहि, स्वप्नातली आहे खरी

## नाजुकता

नाजूकता ऐसी कुणी, पाहिली नाही कधी
नजरही आम्हीं तिच्यावर, टाकली नाही कधी
भय अम्हा नाजूकतेचे, हेच होते वाटले
भारहि नजरेतला या, सोसेल नव्हते वाटले

टाकिसी हळुवार अपुली, नाजूक इतुकी पाऊले
टपकती हलकेच जैसी, पारिजाताची फुले
नाजूकता जाणून आम्ही, आधीच होती बिछविली
पायातली केंव्हाच तुझिया, विकल हृदये आपुली

इतुका तरी, हा स्पर्श हृदया, होईल होते वाटले
इतुके तरी, सद्‌भाग्य उदया, येईल होते वाटले
कल्पना नाजूकतेची, आम्हासही नव्हती कधी
गेली अम्हा तुडवून केंव्हा, कळलेच ना गेली कधी

(शृंगाराचा निरोप असा घ्यावा लागतो)

कुंतलांनो, अंचलांनो, द्या रजा घ्या शुक्रिया
वेगळ्या विश्वात आता, आहो निघालो जावया
मानतो आभार तुमचे, मानतो उपकार मी
निर्भत्सिण्या तुम्हास, नाही साधु कुणी वा संत मी
ऐसे नव्हे की आजही, कंटाळलो तुम्हास मी
सौंदर्य कां विषयातले या, केंव्हा कुठे होते कमी
आज घटिका जीवनाची, संपावयाला लागली
शुक्रिया, दारी कुणाची, चाहूल येऊ लागली

□□□

## जीवन

सोडले ना घर कधीही, गेलोच ना दुसऱ्या घरी
काळ पण आला असा, मी पाहुणा घरच्या घरी

खूप होता गर्व मजला, की नव्हे सामान्य मी
कल्पना विश्वात होतो, जैसा कुणी सम्राट मी
जुळविले मी हात जेंव्हा, वास्तवाशी मी जरा
कळले मला, माझ्याहुनी, कोल्हा बरा कुत्रा बरा

होता असाहि काळ, सारे नम्र होते मजपुढे
झेलण्याला शब्द माझा, होते उभे मागेपुढे
आता कुठे तो काळ, त्याची खूणहि ना राहिली
आसवे माझीच माझ्या, काबूत नाही राहिली

सारे मला विसरोत, त्याचे वाईट ना वाटे मला
वाटते वाईट, त्यांना, विसरता ये ना मला
वाचला वेदांत आणि, क्षणमात्र त्यांना विसरलो
दोस्त हो, दुसऱ्या क्षणी मी, वेदांत सारा विसरलो

होती जरी अपमान आता, जीवनी आधीमधी
साहतो हासून जैसे, काहीच ना झाले कधी
साधुपरी या रागलोभा, नसते अम्हीही सोडले
आम्हासही नसते जरी का, यौवनाने सोडले

आसवे इतुक्याचसाठी, नाही कधी मी गाळिली
गाळायची होती अशी की, नसतील कोणी गाळिली
आसवांच्या या धनाला, जाणून मी सांभाळिले
आज या वृद्धापकाळी, यांनी मला सांभाळिले

वाटते नव्हते कधी हा, काळ आहे यायचा
संपेल हे उद्यान आणि, आहे सहारा यायचा
याही स्थळी रेतीत आम्ही, फुलबाग आहे लाविली
इतुकेच की मी आज येथे, नुसती अबोली लाविली
गंधही आहे इथे, आहे अबोली ही जरी
आहे स्मृतींचा गंध येथे, यांना जरी नसला तरी
रिझविण्या आम्हा इथेही, आहेत कोणी सोबती
सोबती आहेत आसू, गतकाल आहे सोबती

आसूसवे या आज मीही, बागेत माझ्या विहरतो
घेऊनिया जलभार जैसा, मेघ व्योमी विहरतो
शास्त्रातही जो स्पष्ट इतुका, नाही कुठे सांगितला
अर्थ साऱ्या जीवनाचा, यांनी मला सांगितला

जीवनांती आज हे ही, नसते जरी का शेवटी
विझविण्या शोकानला या, कोण होते शेवटी ?
येऊनि नयनात जैसे, गालावरी हे उतरले
करुणाघनाचे दूत वाटे, सांत्वनाला उतरले
वाटले कोण्या ऋषींची, साथ आहे भेटली
वाटले की माय जैसी, लेकराला भेटली
जीवनाचे सत्य काही, बघण्यास जर कोणा हवे
दोस्त हो, ते पाहण्याला, डोळे नको आसू हवे

आसूतुनी जेंव्हा अता, या विश्वाकडे मी पाहिले
अजवरी नुसतेच वाटे, स्वप्न आम्ही पाहिले
तेच सारे विश्व, नाही लेश कोठे बदलला
बदलला जो काय त्याचा, अर्थ सारा बदलला

याच त्या अर्थास म्हणती, सत्य सारी दर्शने
झाले कुणी जे मुक्त, झाले फक्त याच्या दर्शने
हासू नका पाहून माझ्या, आसवे डोळ्यात ही
सांगतो, ऐसे रडाया, खूप पुण्याई हवी

तैसाच आहे शांत मी, या आसवांच्या अर्णवी
शेषावरी श्रीकृष्ण जैसा, झोपला क्षीरार्णवी
काय माझ्या आसवांनी, काय मज नाही दिले
ते दिले जे ईश्वराने, योग्यासही नाही दिले

(आमच्या अनमोल अश्रूपुढे आम्हांला स्वर्गही तुच्छ वाटतो)

स्वर्गातही जाऊन आता, काय मज मिळवायचे
मिळविले सारेच येथे, स्वर्गात जे मिळवायचे
इंद्रा, अरे सांगू नको, त्या मेनका अन् उर्वशा
कोणा हव्या विसळून तुमच्या, या चहाच्या कपबशा
कल्पवृक्षाची तुझ्या या, ना अम्हा मातब्बरी
अमुच्या अरे या कुंपणाची, त्याहुनि मेंदी बरी
त्यांनाच ने स्वर्गात, ज्यांनी त्रास येथे भोगला
राहून नुसत्या संयमाने, वनवास येथे भोगला
आम्हा कशाला स्वर्ग, आम्हा काहीच ना येथे कमी
आहे जरा जास्तीच येथे, स्वर्गात जे आहे कमी
आसवे आहेत येथे, दर्दही आहे इथे
विषयातुनि उपजेल ऐसे, वैराग्यही आहे इथे
तुमच्यापरी नुसतेच इंद्रा, विषयात ना वाहू अम्ही
भोगूनही विषयास अंति, मोक्षासही जाऊ अम्ही
हे हवे आम्हास, आम्ही स्वर्ग याला मानतो

साफल्य साऱ्या जीवनाचे, आसूत आम्ही मानतो

फेडून घे अर्मान दैवा, मागेपुढे पाहू नको
नाही कधी म्हणणार मीहि, आता पुरे, आता नको
भोगिले आहे अम्हीही, भोगावया जे पाहिजे
जीवनी आता अम्हाही, चेंज थोडी पाहिजे

पाहिले ऐश्वर्य तेही, आहे तुम्ही जे पाहिले
पाहिले जास्तीच आम्ही, बर्बादीचेही पाहिले
राखेतली या धुंद आहे, फक्त दोघा समजली
समजली आम्हास आणि, शंकराला समजली

भंगल्या मूर्ति तयांचे, भाव नाही भंगले
भंगले मंदिर, त्याचे, शिल्प नाही भंगले
जीवनी बर्बादीलाही, झेलूनी येथे अम्ही
आहो उभे तैसेच, जैसी वेरूळची लेणी अम्ही

रडविले देवादिका तूं, ऐकिली कीर्ति तुझी
रडविण्या आम्हास दैवा, माय त्या व्याली तुझी
जेंव्हा कधी नयनात तूं या, अश्रूस होते निर्मिले
प्रत्युत्तरी तात्काळ मीहि, शेर काही निर्मिले

याच शेरांनी जगाची, उत्स्फूर्त वाहवा घेतली
दीनता नव्हती कुठे, नाही अरेरे घेतली
नुसतीच ना अपुली व्यथा, शेरात मी सांगितली
वाटले जैसी नव्याने, गीता कुणी सांगितली

(जीवनाचे संग त असे असावे)

अजवरी बेधुंद जैसा, मांड आम्ही गाईला

त्याच त्या तल्लीनतेने, जोगियाही गाईला
जाणतो इतुकेच, आम्हा मस्तीत आहे गायचे
दोस्त हो, हे दैव जाणे, काय केंव्हा गायचे

येतो असाही काळ, केंव्हा, कांही असेही गायचा
जोगिया डोक्यात आणि, मांड असतो गायचा
कौशल्य माझ्या गायनाचे, कळलेच ना कोणा कधी
गेलो असा गाऊन, नाही बेसूरही झालो कधी

(जीवनाचा निरोप घेताना आम्ही परमेश्वराला सांगतो)

आलो तुझ्या दुनियेत, नव्हतो चोर वा डाकू अम्ही
एकही ना चीज इथली, घेऊनि गेलो अम्ही
तेही असो, अमुच्यासवे आणिला ज्याला इथे
भगवन्, अरे तो देहही मी, टाकूनी गेलो इथे

नुसतेच ना दुनियेत तुमच्या, आलो अम्ही गेलो अम्ही
भगवन्, तुझ्या दुनियेस काही, देऊनी गेलो अम्ही
शायरी अर्पून गेलो, माझे जणु सर्वस्व ती
दुनिया तुला विसरेल भगवन्, ना अम्हा विसरेल ती

□□□

चंद्रमा हासे नभी, शांत शीतल चांदणे
आमुच्या आहे कपाळी, अमृतांजन लावणे
लावण्या हेही कपाळी, नसतो तसा नाराज मी
आहे परी नशीबात हेही, अपुल्याच हाती लावणे

गेलो फिराया दूर, तेथे खूप आम्ही बोललो
टाळुनि बोलायचे ते, सर्व काही बोललो
कोणी अम्हा ना पाहिले, आम्ही कुणा ना पाहिले
ओशाळलो ऐसे जसे की, साऱ्या जगाने पाहिले
दोघेच होतो, शक्य नव्हते, येणे तिथे तिसरे कुणी
लाजवीला मी शिवाजी, गेलो तसे आलो अम्ही

पत्रे तिला प्रणयात, आम्ही खूप होती धाडिली
धाडिली होती अशी की, नसतील कोणी धाडिली
धाडिली मजला तिनेही, काय मी सांगू तिचे
सर्व ती माझीच होती, एकही नव्हते तिचे

पत्रात त्या जेंव्हा तिचेही, पत्र हाती लागले
वाटले जैसे कुणाचे, गाल हाती लागले
पत्रातही त्या हाय ! तेथे, काय ती लिहिते बघा
माकडा, आरशात अपुला, चेहरा थोडा बघा

सार्थता संबोधनाची, आज ही कळली मला
वैय्यर्थता या यौवनाची, तीही अता कळली मला
नाही तरीही धीर आम्ही, सोडला काही कुठे
ऐसे नव्हे की माकडाला, माकडी नसते कुठे

वाटले विरहात माझ्या, आसवे गाळील ती
वाटले, चिठ्ठी तरी, काही मला धाडील ती
म्हणते कशी, सौंदर्य विरही, तेंव्हाच मजला समजले
आहे अशी विरहात मी, हे लोकास जेंव्हा समजले

पत्ता जसा विरह व्यथेचा माझ्या, जगाला लागला
जो तो मला येऊन अगदी, त्याचीच मानू लागला
प्रतिसाद मी त्या सुजनतेला, तैसीच देऊ लागले
जो जो कुणी भेटेल त्याला, तूच मानू लागले

विसरा गुलाबी गाल, विसरा कुंतलांची विपुलता
अंचलाने स्पष्ट होते, अंचलाची विफलता
ठेवुनी जाणीव याची, प्रत्येक आहे नेसली
नाही अरे, इतुक्याच साठी, नऊवार कोणी नेसली

ऐसे जरी समजू नका, आहे निराशा व्हायची
ऐसे नव्हे अगदीच काही, सोय नाही व्हायची
बघता तसे सांगू खरे, काही कमी नाही इथे
आहे इथे सारेच आणि, तेही पुन्हा जिथल्या तिथे

समजा जरी का वाटले, कोणा कमी काही कुठे
ऐसे नव्हे तो पार्ट यांचा, मिळणारही नाही कुठे

केसास देतो वेव्हज् आम्ही, फेस पावडर लावतो
घालतो बुशशर्ट जैसा, ब्लाऊज आम्ही घालतो
मर्द पण आम्हा म्हणाया, शंका नका आणू कधी
सांगतो, शपथेवरी, बाळंत ना झालो कधी

मजनू अरे थोडा अम्हा का, भेटला असतास तूं
एकही आसू खरोखर, गाळला नसतास तूं

एक नाही, लाख लैला, मिळविल्या असत्या अम्ही
मिळविल्या नुसत्याच नसत्या, वाटल्या असत्या अम्ही

उन्मेष माझ्या यौवनाचा, काहीच ना झाला कमी
फक्त बघतो एक जागी, दर्पणी वार्धक्य मी
बिंब ते प्रतिबिंब नोहे, शास्त्रसंमत हे जरी
मी तरी घेऊ कशाला, वार्धक्य ते माझ्यावरी

दर्पणी वार्धक्य माझे, ना पाहतो ऐसे नव्हे
समजावितो अपणा तरीही, 'जाऊ द्या, तो मी नव्हे'
प्रहसनी 'तो मी नव्हे'च्या, सर्वांस जो की फसवितो
काय त्या काजीत येथे, जो तो स्वतःला फसवितो

ऐसे नव्हे की प्रहसनी त्या, फक्त काजी जन्मला
काजीविना दुनियेत साऱ्या, कोणीच नाही जन्मला
मंचावरी काजीस जेंव्हा, कौतुके मी पाहतो
हासतो गालात, वाटे, काजीस काजी पाहतो

दोस्त हो, दुनियेस धोका, मेलो तरी आम्ही दिला
येऊनही नरकात पत्ता, कैलासचा आम्ही दिला
हाय ! हे वास्तव्य माझे, सर्वांस कळले शेवटी
सारेच हे सन्मित्र माझे, येथेच आले शेवटी
बोललो पाहून त्यांना येथे कसे आला तुम्ही
होता तुम्ही सद्वृत्त, ऐसे अमच्यापरी नव्हता तुम्ही
बोलले जैसे जगाला, तूं कुशलतेने फसविले
आम्ही अरे, तैसेच अमुच्या, साधेपणाने फसविले

मृत्युची माझ्या वंदता, सर्वत्र जेंव्हा पसरली
घबराट इतुकी नर्कलोकी, केंव्हाच नव्हती पसरली

प्रार्थिती देवास, म्हणती, सारे अम्हाला वाचवा
वाचवा आम्हास, आणि, पावित्र्य इथले वाचवा

ऐसे नव्हे की बेवकूफी, माझी मला ना समजली
समजली प्रत्येक वेळी, थोडी उशीरा समजली

शब्दही या पौरुषाचा, बोललो नाही कधी
जगलो असा गुपचाप जैसा, जन्मलो नव्हतो कधी
दीर्घायुष्याचे मर्म माझ्या, समजणे सोपे नव्हे
मृत्यूसही वाटेल याला, हातही लावू नये

वाटे धरू सन्मार्ग आता, काळ थोडा राहिला
वाटे कशाला व्यर्थ आता, काळ थोडा राहिला
आहे जरी नक्कीच ठरले, व्हायचे नापास मी
मिळवूनियाही काय आता, हस्ताक्षराचे मार्क मी

मानतो शास्त्रे पुराणे, भोळा नका समजू मला
श्रद्धा नव्हे नुसतीच येथे, आहे पुरावा चांगला
सांगती सत्शील मरती, अल्पायुषी ते बापुडे
शास्त्र सत्याचा पुरावा, हा मी उभा तुमच्यापुढे

म्हणती मला शाबास, साऱ्या विषयास तुम्ही सोडले
मी तरी सांगू कशाला, कोणी कुणाला सोडले
ओळखी या संयमाशी, माझी तरी नव्हती कधी
दोस्त हो, कीर्ति अशी, फुकटातही येथे कधी

जातो तिथे उपदेश आम्हा, सांगतो कोणीतरी
कीर्तने सारीकडे, चोहीकडे ज्ञानेश्वरी
काळजी अमुच्या हिताची, येवढी वाहू नका

जाऊ सुखे नरकात आम्ही, तेथे तरी येऊं नका

गेलो जरा स्वर्गात, बघण्या काय आहे ते खरे
ऐकिले जे काय आम्ही, सारेच नव्हते ते खरे
ऐसे नव्हे की अप्सरा, स्वर्गात नसते एकही
इंद्राघरी असतात साऱ्या, बाहेर नसते एकही

आणखी सांगू पुढे, मी काय जास्ती पाहिले
कल्पवृक्षाच्या तळीही, दीन दुबळे पाहिले
झाला जरासा भास, वाटे पाहून मजला हासले
नुसताच होता भास, नव्हते जन्मातही ते हासले
होते जरासे अंग त्यांनी, वस्त्रात अपुल्या झाकले
इतुकेच की झाकावयाचे, तेच नव्हते झाकले
स्वर्गहि वैराण करण्या, एकत्र ते होते तिथे
दोस्त हो, इथलेच सारे, सर्वोदयी होते तिथे

आनंदलो क्षणमात्र तेथे, पाहुनी काही स्त्रिया
काय सांगू कर्म, होत्या, त्याही म्हणे साध्वी स्त्रिया
वंचना झालीच नव्हती, माझी अशी जन्मातही
एकीकडे साध्वी स्त्रिया, एकीकडे सर्वोदयी

पुण्यक्षयावाचून नाही, स्वर्गातुनी सुटका तिथे
हाय ! या पुण्यक्षयाचा, मार्गही नाही तिथे
प्रार्थुनी देवास पुसले, काय मी सांगा करू
स्वर्गातुनी सुटण्यास तुमच्या, पापे तरी कुठली करू
अप्सरा तुमच्या महाली, बाहेर या असल्या स्त्रिया
तू ही तरी देवा, अरे, म्हणशील का यांना स्त्रिया
ओशाळला ऐकून, त्याने अंती अम्हा मुक्ति दिली

मुक्ति दिली फुकटात, नाही अप्सरा कोणी दिली
आलो घरी परतून, सांगा होऊ कशाला मुक्त मी
ऐसे नव्हे आम्हास तैसे, काही घरी होते कमी
उघडेच होते दार नव्हते, चिन्हही कोठे तिचे
ऐकले दुसऱ्या कुणाशी, लग्नही झाले तिचे
लागला धक्का तिचा, जोरात पण होता मऊ
ती म्हणे 'सॉरी' मला, मी म्हणालो 'थँक्यू'
तिरप्या तिच्या नजरेवरी, बेहद्द झालो खूष मी
आज पण कळले मला, ती ऐसीच बघते नेहमी

□□□

## मृत्यू

ऐसे नव्हे मृत्यूस आम्ही, केंव्हाच नाही पाहिले
खूप आहे पाहिले त्या, प्रत्येक जन्मी पाहिले
मारीले आहे अम्हीही, मृत्यूस या प्रत्येकदा
नुसतेच ना मेलो अम्ही, जन्मलो प्रत्येकदा

जन्मलो तेंव्हाच होते, लग्न अमुचे लागले
बघितले होते तिने मज, मीच नव्हते बघितले
समय माझ्या मीलनाचा, होती उभी मोजीत ती
आज भेटे मौत आम्हा, जैसी शिवाला पार्वती

मृत्यो, अरे येतास जर का, होऊनी साकार तूं
सांगितले असते तुलाही, कोण मी अन् कोण तूं
तुजसवे लढण्यात काही, शान असती वाटली
घरच्या घरी मरण्यात ऐसी, लाज नसती वाटली
हे खरे की तूच असते, अंती अम्हाला मारिले
काय मोठे त्यात, आहे, देवादिका तूं मारिले
नसता जराही खेद, असतो, ऐसे जरी मेलो तरी
लाभता बहुमान स्वर्गी, वीरचक्राचा तरी

कंठतो आयुष्य नुसत्या, आशेत या आता तुझ्या
येतो मनाला धीर नुसत्या, कल्पनेनेही तुझ्या
आहे जसा की ध्यास तुमचा, आता जिवाला लागला
हाय ! पण दारी तुझ्याही, केवढा 'क्यू' लागला

मृत्यो, अरे, तूं का कुणाला येऊ नयेसा वाटतो
येतो असाही काळ जेंव्हा, तूच यावा वाटतो

असते जरी काळी अशा, तू ही कुणा सम्मानिले
देवाहुनीही जास्त असते, आम्ही तुला सम्मानिले

बांधला गाऱ्यावरी, रेडा तसा हा आज मी
चघळीत आता स्वस्थ बसलो, नुसत्या स्मृतींचा घास मी
मृत्युची थोडी कुठोनी, चाहूलही येता मला
वाटे जसा की तोच आला, धीर द्यायाला मला

मृत्यो, अरे आताच जर ना, न्यावया येशील तूं
आसवांच्या या प्रवाही, वाहुनी जाशील तूं
मृत्यो, अरे मृत्यूपथे, तूही असा गेला अशा
द्यावी कुणाला हाक आम्ही, वृद्धापकाली या अशा

मृत्यो, अरे आलास जर का, क्षीण मी होता असा
म्हणवेल का तेंव्हा मलाही, साधे तुम्हांला 'या बसा'
ज्याच्यासवे अज्ञात देशी, जावयाचे शेवटी
शोभेल का त्याशीच ऐसे, वागून आम्हां शेवटी

ये अरे आताच, मृत्यो, कुठवरी सांगू तुला
प्रेत का नुसतेच माझे, न्यायचे आहे तुला
थोडा जरी का वेळ आता, याहुनी घेशील तूं
जातील माझे प्राण आणि, येणारही नाहीस तूं

मृत्यो, अरे येतास जर का, थोडा असा आधी तरी
ऐकुनी जातास तूही, शेर एखादा तरी
एकही नाही कला तूं, मानवांची पाहिली
जेथे जिथे गेलास त्यांची, मातीच नुसती पाहिली

ओळखी नव्हती तरीही, भेटावया आले मला

खांद्यावरी अपुल्या स्वतःच्या, वाहुनी नेले मला
ना कळे की पूर्वजन्मी, काय मी त्यांना दिले
इतके खरे की आज त्यांना, थँक्सही नाही दिले

जन्मातही नव्हते कधी मी, तोंड माझे लपविले
मेल्यावरी संपूर्ण त्यांनी, वस्त्रात मजला झाकले
आला असा संताप मजला, काहीच पण करता न ये
होती अम्हा जाणीव की, मी मेलो, अता बोलू नये

कफन माझे दूर करुनी, पाहिले मी बाजूला
एकही आसू कुणाच्या, डोळ्यात ना मी पाहिला
बघुनी हे माझेच आसू, धावले गालावरी
जन्मभर हासूनही मी, रडलो असा मेल्यावरी

सूडही याचा तसा, नाही कमी मी घेतला
जन्मही पुढचाच माझा, अजमीरला मी घेतला
एकही रडल्याविना ना, राहिला तेथे कुणी
इतुकेच की तेथे तसा, फुकटात ना रडला कुणी

मरता अम्ही शोकार्णवी, बुडतील सारे वाटले
श्रद्धांजली तर जागजागी, देतील होते वाटले
थोडे जरी का दुःख माझे, असते कुणाला वाटले
जळण्यातही सरणात मजला, काहीच नसते वाटले

ऐसे जरी संतोष तेंव्हा, मानिला इतुकाच मी
कळलेच ना तेंव्हा कुणा, कफनात जे रडलो अम्ही
त्यांचेच हे उपकार, ज्यांनी झाकले होते मला
झाकिती प्रेतास का ते, तेंव्हा कुठे कळले मला

लाभला एकांत जेंव्हा, सरणात त्या माझ्या मला
रोखता आलाच नाही, पूर अश्रूंचा मला
जेंव्हा चिताही आसवांनी, माझी विझाया लागली
चिंता कसा जळणार आता, याचीच वाटू लागली

सरणातुनी नक्कीच तेंव्हा, बाहेरही येतो असा
ना जरी बघतो तमाशा, प्रेतयात्रेचा असा
बोललो अपुल्या स्वतःशी, केंव्हा तुला समजायचे
स्वजनात का वेडचा अशा या, परतून असते यायचे
आनंद का बघता तुला, आहे कुणाला व्हायचा
झाला कुणाला शोक, जो की शांत आहे व्हायचा
जळलो सुखे हा मोह जेंव्हा, उरलाच ना काही कुठे
सरणावरी इतक्या सुखाने, कोणीच ना जळला कुठे
होता जरी संतोष, ऐसा सरणात या माझ्या मला
आसवे या शायरीची, बघवली नाही मला
बोलली, झाले तुझे, होतेच जे की व्हायचे
ना कळे, आता पुढे, काय माझे व्हायचे ?
बोललो, आता खरी, सन्मानिली जाशील तू
व्यर्थ या साहित्यिकांना, भ्यायली आहेस तू
संमेलनी साहित्यिकांच्या, आता तुला नेतील हे
वाटले होते तसे, वाईटही नाहीत हे
वैर का यांचे तुझ्याशी, केंव्हातरी होते खरे
होते खरे जे काय, होते फक्त माझ्याशी खरे
आता जशी आयुष्यरेषा, आज माझी संपली
नशिबातली आता तुझ्याही, सारी उपेक्षा संपली
आनंदली ऐकून, जेंव्हा सर्वासवे ती परतली

हासूनी गालात आम्हा, 'टा टा' करोनी परतली

आपुल्या मागे असा, मृत्यू जरी ना लागता
आपणा अपुल्याच हाती, फास घ्यावा लागता
पापे जरी हातून माझ्या, वाटेल ती घडली तरी
नाही कधी घडणार नक्की, आत्महत्त्येचे तरी

एकदा मेल्यावरी मी, परतुनी आलो घरी
तेच होते दार आणि, तीच होती ओसरी
होती तिथे तसबीर माझी, भिंतीवरी त्या टांगली
खूप होती धूळ आणि, कसर होती लागली
द्रवलो तिला पाहून, होती शेवटी माझीच ती
दिसली मला पण आज माझ्या, प्रेताहुनी निस्तेज ती
बोलली की हीच का, माझ्यावरी माया तुझी
गेलास ना टाकून, होती प्रत्यक्ष जी छाया तुझी
बोलली, हेही तुला का सांगावयाला लागते
मेल्यावरी जगण्यास वेड्या, खूप कीर्ति लागते
होऊनी स्वार्थांध नुसता, कैसा तरी जगलास तू
आहेस का केला कुठे; जगण्याविना पुरुषार्थ तूं
समजली आता तरी ना, अपुली स्वतःची पायरी
समजले ना काय मिळते, नुसती करोनी शायरी
ओशाळलो ऐकून, नेली तसबीर मी ती उचलुनी
सांगतो, याची तिथे, चर्चाही ना केली कुणी

□□□

## दार्शनिक

यौवनाचे पुष्प ताजे, वाहिले विषयास मी
आलो प्रभो, तुज वाहण्याला, त्याचे अता निर्माल्य मी
कित्येकदा येते मनी, हेही तुला वाहू नये
वाटते तुमची अशी, थट्टा तरी होऊ नये

भगवन्, तुला जर 'हाय' ऐसे नाव असते लाभले
आम्हासही कोटी जपाचे, पुण्य असते लाभले
पाहून हा जपयज्ञ तुजला, संतोष असता लाभला
आम्हासही रडण्यात नुसता, मोक्ष असता लाभला

ना भितो मृत्यूस तैसा, जैसा भितो मोक्षास मी
समजा तिथे कंटाळलो तर, काय मग करणार मी
सांगती त्या रूक्षतेला, अंतही नाही तिथे
सांगती ज्ञाते पुन्हा, मरणही नाही तिथे

**( मानवाला काळजाची देणगी मिळाल्यामुळेच तो सौंदर्यनिर्मिती आणि सौंदर्योपासना करू शकला पण अखेर त्याचे फळ काय ? )**

भगवन्, अरे नुसते कुठे तू काळीज अमुचे निर्मिले
आहे तुझ्या दुनियेत साऱ्या, सौंदर्य आम्ही निर्मिले
ना तरी नुसतेच असते, पाषाण हे सारीकडे
श्वापदे असतो अम्ही, असतो जसे मुंग्याकिडे
नुसतेच ना सौंदर्य तुमच्या, दुनियेत आम्ही ओतले
मानुनी सर्वस्व याला, प्राण येथे ओतले
बदला परी याचा प्रभो, काय तू आम्हा दिला
आम्ही दिले सौंदर्य आणि, नर्क तू आम्हा दिला

काय हे सौंदर्य सारे, विषयात या नाही तिथे
सौंदर्य जर का रूप तुमचे, काय तूं नाही तिथे
कां म्हणू की फक्त आम्ही, विषयास या सन्मानिले
सन्मानिता विषयास आम्ही, आहे तुला सन्मानिले

समजू नको विषयांध, आहे भूल ही देवा तुझी
जेथे जसा नटलास तैसी, भक्तीच मी केली तुझी
पूजीले प्रत्येक वेळी, भावकुसुमांनी तुला
पूजीले मातृस्वरूपी, पुत्रभावाने तुला
रूप जेंव्हा अप्सरेचे, घ्यावे मनी आले तुझ्या
वाहिली तात्काळ मीहि, प्रणयार्तता पायी तुझ्या
भक्ती खरी यालाच देवा, मानतो आम्ही तरी
नवविधा भक्तीत तुमच्या, ही अशी नसली तरी
शिक्षा जरी आहेस आम्हा, नरकवासाची दिली
शिक्षा तुला देवा अम्हीहि, ओशाळण्याची ही दिली

आरोपिता ऐसे जरी, ओशाळला नसतास तूं
लपलासही नसतास ऐसा, निर्गुणाच्या आड तूं
केली क्षमा आम्हीच, आम्हा हेही करावे लागते
करण्या क्षमा दुसऱ्यास भगवन्, माणूस व्हावे लागते

सांगसी निष्काम कर्मा, कृष्णा अरे वेदांत तूं
समजला की काय आम्हा, किर्लोस्करांचा पंप तूं
मोक्ष हा पुरुषार्थ ऐसे, सांगसी जेथे तिथे
तूं तरी देवा कधी, आहेस कां गेला तिथे
भोगिसी ऐश्वर्य, सारे वंदिती इच्छा तुझी
संन्यास पण साऱ्या जगाने, घ्यावा अशी इच्छा तुझी

निष्कामता थोडी जरी, अंतरी असती तुझ्या
धावुनी साऱ्याच येत्या अमुच्याकडे गोपी तुझ्या
केली जरासी दिल्लगी, मानू नको विपरीत हे
जाणतो मीही प्रभो, काही तुझे खोटे नव्हे
लाभण्या सामर्थ्य तुमचे, आशा तरी कैसी करू
दिल्लगीहि ना करू, तर काय मग दुसरे करू

तुमचाच आहे अंश भगवन्, मीहि कुणी दुसरा नव्हे
लोळण्या पायी तुझ्या, तुमचा कुणी कुत्रा नव्हे
हे खरे की आज माझे, प्रारब्ध आहे वेगळे
ना तरी अपणात भगवन्, काय होते वेगळे ?

भगवन्, अरे भेटूनियाही, काय मज देशील तूं
मंत्र्यापरी येशील नुसता, हालुनी जाशील तूं
प्रारब्ध जर अमुचे अम्हाला, आहेच हे भोगायचे
आम्ही तरी सांगा कशाला, कुंकू तुझे लावायचे

जेंव्हा कधी अमुच्यापरी, देहात या आलास तूं
झालास तूंही दीन आणि, ऐसाच हा रडलास तूं
थोडा जरी का काल हाही, विसरला नसतास तूं
सांगतो, आम्हासही पण, विसरला नसतास तूं

केंव्हातरी प्रारब्ध माझे, संपूर्ण हे भोगून मी
संपदा ऐश्वर्य माझे, सारे पुन्हा मिळवीन मी
शब्दही या दीनतेचा, जन्मात ना बोलू कधी
ऐसे नव्हे की काळ हाही, संपायचा नाही कधी

जाणतो हे व्यर्थ आहे, माझे तुझ्याशी बोलणे
विसरेल जो स्वजनास सांगा, काय त्याशी बोलणे

पायही दारी तुझ्या, नसता कधी मी ठेविला
हाय ! या संतावरी मी, विश्वास होता ठेविला

पाहतो साऱ्या जगा, ऐसे नव्हे ना पाहतो
पाहतो तैसेच जैसे, पाहतो ना पाहतो
एकही संवेदना या, अंतरी ना राहिली
नुसतीच आहे लेन्स, आता फिल्म नाही राहिली

जीवनाची रेलगाडी, ना कळे नेते कुठे
तिकिटावरी तर स्टेशनाचे, नांवही नाही कुठे
फुकटात ना येथे अम्हा, आहे कुणी येऊ दिले
दाम साऱ्या सुकृताचे, मोजुनी आम्ही दिले
गोष्टी तशा तर खूप आम्ही, एकमेका सांगतो
जायचे कोणा कुठे, कोणी कुणा ना सांगतो
आहे कुणी टी. सी. परी, हे ना कुणा समजायचे
एकटा तो फक्त जाणे, कोणा कुठे उतरायचे
फेकतो वाटेल त्याला, उचलुनी खिडकीतुनी
सांगती की खूप त्याची, सवय आहे ही जुनी
फेकण्या मजला जसा तो, सरसावला थोडा पुढे
देहात्मतेचा कोट नुसता, मी फेकला त्याच्यापुढे
उचलुनी तो कोट त्याने, फेकला खिडकितुनी
केला मला आदाब आणि, अदृश्य झाला लाजुनी
रेलही अदृश्य झाली, कांही असेही वाचले
तिकिटावरी मी शब्द आता, निर्वाण इतुके वाचले

मारतो राजास एक्का, नहिल्यास दहिला मारतो
कल्पनेचे खेळ सारे, कोणी कुणा ना मारतो

पाहता कोणात काही, नाही कुठेही वेगळे
सारेच तुकडे कागदाचे, छाप नुसते वेगळे
आता जरासा रंग काही, खेळास येऊ लागला
पत्त्यातला राजा स्वतःला, राजाच मानू लागला
राणीसही जाणीव कांही, और होऊ लागली
लाजली नव्हती कधी ती, आज लाजू लागली
दीनतेचा खेद आता, दुर्रीस होऊं लागला
पंजा म्हणे चौऱ्यास आता, श्रीमंत वाटू लागला
विसरुनि निजरूप नुसत्या, नामरूपी गुंतले
भलत्याच काही अवदसेच्या, पाशात आता गुंतले
नुसता उपाधी भेद, कोणी, राजा नव्हे राणी नव्हे
आणखी सांगू पुढे, हा खेळही अमुचा नव्हे
खेळतो दुसराच, त्याला पाहिले नाही कुणी
म्हणती तयाला ईश, म्हणती अल्ला कुणी, येशू कुणी
त्याचा म्हणे हा खेळ, नुसते पत्ते अम्ही पत्त्यातले
एका परी पत्त्यास कळले, मर्म हे पत्त्यातले
आहे इथे रंगेल कोणी, पत्ता असे पत्त्यातला
आहे जसा पत्त्यातला तो, नाही तसा पत्त्यातला
नामरूपाचा स्वतःच्या, पत्ताच ना त्याला कधी
नाही कशाची खंत, होतो राजा कधी, दुर्री कधी
हासतो नुसताच, आहे सर्वाहुनी हा वेगळा
सांगाल कां याहून कोणी, वेदांत काही वेगळा ?

वाहवा ऐकून सारी, आहात जी तुम्ही दिली
मानू अम्ही, आहे पुरेशी, तुमच्यातही जिंदादिली
समजू नका वाटेल त्याला, आहे दिली जिंदादिली

आहे प्रभुने फक्त काही, भाग्यवंतांना दिली
हास्यही मी त्या प्रभूचे, हास्यात तुमच्या मानतो
आशीर्वचे त्याची जशी, या वाहवांना मानतो
ऐसे जरी येते मनी, ही शायरी आता नको
खूप झाली बेवकूफी, जास्ती तरी आता नको
आता परावाणीत आहे, शायरी मज गायची
सांगाल कां ही कां अशी, चौघात असते गायची
अजवरी शब्दातुनी जी, वाहविली शायरी
यापुढे वाहील नुसती, नयनातुनी गालावरी
श्रोता अम्ही या शायरीचा, तोच आता समजतो
अर्थ जो या आज नुसत्या, आसवांचा समजतो
तो प्रभु, सर्वान्तरात्मा, आज मज श्रोता हवा
सांगतो, त्याच्या मुखीही, हीच घेऊ वाहवा

शायरी नुसतीच नाही, गावया आलो इथे
कोण्यातरी जिंदादिलांच्या, दर्शना आलो इथे
प्राण साऱ्या मैफिलीचे, यांनाच आम्ही मानतो
नुसतेच ना या मैफिलीचे, अमुचे स्वतःचे मानतो

दोस्त हो, मैफिल अपुली, रंगण्या जर का हवी
आम्हा नको सौजन्य, तुमची जिन्दादिली नुसती हवी
ऐसे जरी नक्कीच घेऊ, या मैफिलीची वाहवा
तीही अशी ज्या वाहवाला, द्यावी अम्हीही वाहवा

शायरी नुसतीच नाही, गायिली तुमच्यापुढे
आरसा आहे जसा की, ठेविला तुमच्यापुढे
मोहुनी रूपास अपुल्या, वाहवा तुम्ही दिली
ना अम्हा, ना शायरीला, तुमची तुम्हा, तुम्ही दिली □□□

## शृंगार (इष्क)

जाहले कांहीतरी, जे व्हावयाला नको होते
एकटक माझ्याकडे तूं, बघायाला नको होते
पूर्णबिंबा लाजवी, ऐसी मुखावर चारुता
लाजऱ्या डोळयांत होती, मृगशावकाची भीरुता
मिटविल्या ओष्ठद्वयी, होती करांगुलि रोविली
की न सांडो भूवरी, वाया सुधा अधरातली
ऐसे तुला मी पाहिले, जे पाहण्याला नको होते
जीवनाची वेल माझ्या, मी खुडाया नको होते
यौवनोद्धत ऊर उडवी, रेशमी पदरा दुरी
सावरीता त्रासली, होतीस त्या वरच्यावरी
गौरकायेची प्रभा, नेसल्या वस्त्रातुनी
शोभली जोत्स्ना शशीची, विरल मेघाआडुनी
ऐसे तुला मी पाहिले, जे पाहण्याला नको होते
खेळ माझ्या काळजाशी, मी कराया नको होते
सिंहापरी साहीन हा, घाव मरणांतावरी
कळणारही नाही कुणा, झाले असे काहीतरी
जाहले कांहीतरी, जे व्हावयाला नको होते
एकटक माझ्याकडे तूं, बघायाला नको होते

केंव्हातरी बघुनी जराशी, हांस बस इतुके पुरे
वाळलेल्या हिरवळीला, चार शिंतोडे पुरे

अजवरी ना दाविल्या, तुज अंतरीच्या भावना

संयमाने सोसल्या मी, काळजाच्या यातना
आज आली मरणवेळा, जायचे आहे मला
हाय ! माझ्या संयमाने, शेवटी धोका दिला

होते असे भलतेच कांही, इष्कातल्या जगती इथे
हृदयही तेथेच जुळते, नजराहि ना जुळती जिथे

कुठवरी सोसावयाच्या, यातना तुज पाहुनी
वाटते की ठीक होती, चाल पडद्याची जुनी

कोणतेही एक आता, आहे मला विसरायचे
विसरायचे आहे तुला, किंवा मला विसरायचे
अभ्यासुनी ही दर्शने मज, काहीच नव्हते समजले
मानिती अद्वैत का ते, इष्कात मजला समजले

ओळखीही ना दिली, लैलास, ते मजनू अम्ही
यातनासह जन्म गुजरू, भीक ना मागू अम्ही

गर्व रूपाचा जसा, तुम्हास आहे आपुल्या
आम्हासही तितुकाच आहे, विकलतेचा आपुल्या
सौंदर्य माझ्या विकलतेचे, आज मी जे बघितले
सांगतो नाही तसे, तुमच्यातही ते बघितले

पाहता, ओशाळुनि तूं, मान खाली घातली
बघवली नाही तुलाही, आग तू जी लाविली
पेटती ती आग आम्ही, जन्मभर सांभाळतो
प्रितीच्या पंथात आम्ही, अग्नीपूजा मानतो

दोस्त हो, हा इष्क काही, ऐसा करावा लागतो
ऐसे नव्हे नुसताच येथे, जीव द्यावा लागतो

वाटते नागीण ज्याला, खेळण्या साक्षात हवी
त्याने करावा इष्क, येथे, छाती हवी, मस्ती हवी

ना म्हणू इष्कातले या, सौंदर्य त्याला समजले
झाल्यावरी बर्बाद ज्याला, बर्बाद झालो समजले
मद्यातही सांगा नशा, मग काय आहे राहिली
झाल्यावरी बेहोष याची, जाणीव जेथे राहिली

त्याला कुठे कां इष्क ऐसे, आहे मिळाले नांवही
नांवासही ना हाय जेथे, ना आसवांचे नांवही
आसूविना जो इष्क येतो, कोणासही तो भोगता
भोगता इंद्रास येतो, कुत्र्यास येतो भोगता

जायचे भलत्याकडे, जा सुखे निःशंक जा
परत येतांना तरी, या दारावरुनी जात जा
सौंदर्य तुमच्या मीलनाचे, बघितले नाही तरी
वाटले घेऊ बघूनी, ओशाळण्याचे या तरी
कांही असो इष्कास अमुच्या, सन्मानिले आहेस तूं
ना तरी नक्कीच ऐसी, ओशाळली नसतीस तूं
आहेस जो सन्मान आम्हा, ओशाळण्याने तूं दिला
नसतास तूं केंव्हाच अपुल्या, मीलनानेही दिला

पेल्यातले प्या मद्य, पण ओठातले प्राशू नका
दुरुनिच याची ये नशा, जवळी त्या जाऊ नका
स्पर्शणे तर दूर राहो, बघितले नुसते जरी
याची नशा, मी सांगतो, उतरते मेल्यावरी

भिन्न मद्यांच्या चवी, आम्ही क्रमाने चाखतो
पेल्यातली घेऊन आधी, ओठातली मग चाखतो

वेगळी कॉकटेल ऐसी, एकत्र ना मिसळायची
सांगतो, याची मजा, चौघात नाही यायची

कैसे म्हणू की नजर अपुली, कोणावरी टाकू नको
इतकेच की पेल्यातल्या या, मद्यावरी टाकू नको
बेहोष ना होऊ कितीही, आम्ही जरी ही घेतली
सांगतो, अद्याप आम्ही, कॉकटेल नाही घेतली

अपुल्याच दांती ओठ अपुला, चावणे नाही बरे
हक्क अमुचा, अमुच्यासमोरी, मारणे नाही बरे
घेतला तू वेळ जेंव्हा, सावराया अंचला
वाटले तेंव्हाच द्यावे, 'थँक्स' येऊनिया तुला

धस्स ना जर होतसे, काळीज तू येताक्षणी
अपुल्यामधे कोणात काही, नक्की जरा आहे कमी

बेवफाईचा तिच्या, आरक्त वदनी निलीमा
ऐसा खुले, की मोहुनी, मी तिला केली क्षमा

नेसली जॉर्जेट काळे, गौर तनु झाकावया
आज वाटे अवस आली, पौर्णिमा ग्रासावया
वस्त्रातुनी त्या अंगकांती, तैसीच आता शोभते
यमुनाजळी गोपांगनांचे, वैवस्त्र्य जैसे शोभते

जाणते ती लाख नुसत्या, जीव घेण्याच्या तऱ्हा
सरळ आहे भांग आणि, निष्पाप आहे चेहरा
सांग मी मरणार कैसा, नेत्रबाणांनी तुझ्या
जाणतो, निःशंक आहे, संजीवनी अधरी तुझ्या

बघता तुम्हां ही, नजर तुमची भूतली जी लागते

सौदामिनी नेत्रातलीही, अर्थ व्हावी लागते

चालता लचकून आणि, मुरडून जेंव्हा चालते
वाटते नागीण कोणी, आता उभ्याने चालते

मरती जिते पण, प्रेतही, हासते आनंदुनी
ना कळे डोळ्यात तुझिया, संहार कां संजीवनी

घेती जरा का वेळ थोडा, सावराया अंचला
मानिले असतेही अमुची, पर्वा जरा आहे तिला

आहे अम्हा जाणीव अमुचा, मृत्यू कुठे हा राहतो
आहे असा वस्ताद बेटा, नयनात त्यांच्या राहतो
आहे दया हृदयात त्यांच्या, ईश्वरानेही दिली
आमुच्या नजरेस त्यांनी, नजरही नाही दिली

दोस्त हो, आहो तरीही, इष्कात या मेलो अम्ही
आज ना बघण्यात यांच्या, ऐसे अत्ता मेलो अम्ही
मानू अम्ही, त्यांनी अम्हाला, हासून नसते पाह्यचे
सांगा बरं, आहे बरं का, अगदीच नाही पाह्यचे

गेला तुम्ही सोडून त्याचे, काही अम्हा ना वाटले
व्हायचे इष्कात ऐसे, आधीच होते वाटले
हृदयही पण हाय ! माझे, फितुर झाले शेवटीं
गेले अम्हा सोडून तेही, तुमच्याच मागे शेवटी

विरहार्णवी आहे जरि का, तुम्ही अम्हाला सोडले
क्षणमात्रही नाही कधी, तुमच्या स्मृतींनी सोडले
माझ्यावरी हे प्रेम त्यांचे, मी पाहिले नाही कुठे
धन्य या तुमच्या स्मृतींची, या कुठे, तुम्ही कुठे ?

यांच्या बळे नुसताच नाही, विरहास साऱ्या विसरलो
सांगू खरं, आता तुम्हाही, साफ आहे विसरलो
ओळखी तुमच्याच आधी, यांची जरी होती कधी
पाऊलही दारी तुझ्या मी टाकिले नसते कधी
दुर्दैव या इष्कात की मी, आधी तुम्हाला भेटलो
भेटलो आधी तुम्हाला, मागून यांना भेटलो

नसते कमी इष्कात नुसत्या, यांच्या स्मृती असत्या तरी
नसते कमी या अप्सरांचा, पत्ता जरी नसता तरी
वाईट या इष्कात आम्हा, याचेच वाटू लागते
यांच्या स्मृति येण्यास यांची, भेट व्हावी लागते

ऐसे नव्हे पडदानशीं मी, कोठेच नाही पाहिल्या
पडदानशीं यांच्यापरी मी, कोठेच नाही पाहिल्या
करतील का पडदा असाही, पडदानशीं कोणापुढे
मिटल्याविना मी नेत्र नाही, या कधी आल्या पुढे
प्रीति अशी मीहि कुणाची, पाहिली नाही कुठे
माझ्याविना यांचा जगाशी, संबंधही नाही कुठे
नजरही यांनी कुणावर, टाकिली नाही कधी
माझ्या स्मृति नाही कुणाच्या, स्वप्नातही गेल्या कधी

पेड वेणीचे तुझ्या जे, पुरुषभावा पोचले
काबूत ना उरले तुझ्या ते, वाटेल तेथे पोचले
झाकिसी मुखचंद्रमा करपल्लवी, तूं लाजता
सोसवेना तेवढाही, विरह आम्हाला अता

विंचरी हळुवार हाती, केस जे की गुंतले
माझ्या तिथे या जीविताचे, आहेत धागे गुंतले

रूप-यौवन संपदेची, वर्णने नाही कमी
वर्णिले ते सर्व एका, ' हाय ' या शब्दात मी

ना दिला होकार त्यांनी, इन्कारही नाही दिला
प्रतिसाद या इष्कात आम्हा, जो दिला, तो हा दिला
सफलता इष्कात याही, वाटती थोडी तरी
अपुल्या मुखे आम्हास साधा, इन्कारही देती तरी
आमुची इतकी जरी का, दखल असती घेतली
मी तरी नुसती निराशा, मानून नसती घेतली
नाहीतरी या अप्सरांचे, ऐसेच असते शेवटी
सांगती इन्कार यांचा, होकार होतो शेवटी
घट्ट इतके पीळ अपुल्या, वेणीस का देतेस तू
वेणी नव्हे ते, हृदय माझे, हाती तुझ्या धरलेस तूं

हाय ! या इष्कात झाली, तीच अमुची दुर्गती
स्फटिकोदकी होते जशी का, कमलपत्राची गती
निर्लेपता त्यांची जरी का, वर्णिली कोणी अशी
जाणतो आम्हीच त्यांची, यातनाहि ही अशी

आसवे नयनात ज्याच्या, चमकली नाही कधी
काळजाचा दर्द ज्याला, माहीतही नाही कधी
बर्बादीचे ऐश्वर्य ज्याने, जन्मात नाही पाहिले
शांती मिळो आत्म्यास त्याच्या, काय त्याने पाहिले

ना म्हणू इष्कात कोणी, पाऊलही टाकू नका
इतकेच की या विकलतेला, दीनता मानू नका
सौंदर्य तर या विकलतेचे, भोगायचे असते इथे
ऐसे नव्हे की दैन्य नुसते, भोगायचे असते इथे □□□

कुंतलांना सावराया, हात मागे गुंतले
त्याच वेळी मजकडे, जाणून त्याने बघितले
हासला निर्लज्ज वरुनी, मी लाजले रागावले
रागावले, तीहि अशी की, हासुनी रागावले

बघीतले नसतेही आम्ही, ना अशी जर लाजती
निखळत्या पदरास आणि, हातही ना लावती
बुद्धापरी होतो उगे, ठायीच आम्ही आमुच्या
व्यर्थ आला अविनयाचा, आळ माथी आमुच्या

झाली उगा गंभीर, नव्हते बोलायचे काही तिला
काही करा पण आज अगदी, लाजायचे नव्हते तिला
ऐसे जरी, नाही तिलाही कळले, कशी ती लाजली
आज ती नुसतेच जेंव्हा, लाजावयाला लागली

निखळत्या पदरास अपुल्या, हातही ना लाविशी
दृष्टी तरी लाजून अपुली, भूतली तूं लाविशी
ना कळे आम्हा तरी, दोहोतली या संगती
संभ्रमी आहो अम्ही, हे, आव्हान का शरणागती

□□□

# जीवन

मृत्यूची छाया जशी, ही स्पष्ट होऊ लागली
तेंव्हा कुठे या जीवनाची, ओढ वाटू लागली
मध्यान्हिचीही सोय जेंव्हा, एकही ना राहिली
तेव्हा कुठे चूर्णाविनाही, भूक वाढू लागली

निर्लज्जता थोडी जरी या, जीवनी असती कमी
लावला केंव्हाच असता, माझ्या गळ्याला फास मी
दोस्त हो ! वार्धक्य हेही, सत्य होऊ लागते
थोडी जरा निर्लज्जतेची, साथ घ्यावी लागते
मूल्य या निर्लज्जतेचे, नक्कीच आहे जीवनी
आज या वृद्धापकाली, ही खरी संजीवनी

जीवनांती खास तैसे, कांहीच नव्हते राहिले
होते जरा अपमान थोडे, व्हावयाचे राहिले
ओळखीही दुर्दशेशी, व्हायची होती खरी
आता कुठे या जीवनाला, पूर्णता आली खरी

कोणीच ना माझे खरे, सिद्धांत हा खोटा नव्हे
सारेच माझे आप्त हेही, आहे खरे खोटे नव्हे
कोणीच ना माझे जसे, समजावयाला लागते
सारेच माझे आप्त हे ही, तेंव्हा कळाया लागते

नाही जराही खेद, नाही कोणी जरी माझ्यासवे
आहेत माझ्या सोबतीला, अनमोल माझी आसवे
प्रारब्धही पण नेहमीचे, आहेच माझ्यासोबती
दोस्त हो, मरणातही या, काल आहे सोबती

आवेग माझ्या भावनांचे, ना कळे गेले कुठे
ना कळे की आज माझी, आसवे गेली कुठे
हाय ! माझ्या जीवनी या, सारेच काही संपले
संपले केंव्हाच हासू, आज आसू संपले

आसवे पुसण्यास जेंव्हा, कोणीच नाही राहिला
थेंबही या आसवांचा, डोळ्यात नाही राहिला
हासतो गालात येता, हेही कळोनी शेवटी
होते जसे माझे रडेही, दुसऱ्याचसाठी शेवटी

बर्बादिचा या आज आम्हा, ना खेदही ना खंतही
झाले उगा बर्बाद येथे, सत्‌शील तैसे संतही
इतुका तरी संतोष आहे, आज हा अमुच्या मनीं
झालो स्वये बर्बाद, आम्हा बर्बाद ना केले कुणी
जीवनी या फक्त आहे, आम्ही अम्हाला मारले
आम्ही अरे, जाणून, डोळे दुर्दशेला मारले
दोषही याचा कधी, नाही कुणा मी लाविला
लाविला जो काय नुसता, हात भाली लाविला

वार शस्त्रांचे कसेही, येतील सारे सोसता
त्यालाच मानू शूर, ज्याला अपमान आले सोसता
मानतो प्रत्यक्ष लक्ष्मी, तेथेच आहे उतरली
वैभवाची ऐट ज्याच्या, दैन्यातही ना उतरली

आरशातुन एकटक, मज कुणी पाहात होते
नयनीच होता जीव बाकि, सर्व काही प्रेत होते
सांगति संतादिकांनी, मरण त्यांचे पाहिले
दर्पणी आहे अम्हीही, प्रेत अमुचे पाहिले

ना कळे की पूर्वजन्मी, त्रास मी कोणा दिला
त्याने जसा की यौवनाचा, शाप आम्हाला दिला
यौवनीहि, यौवनाचे, जे दुःख कोणी भोगतो
आज मी वृद्धापकाळी, त्याहून जास्ती भोगतो

पौत्रादिका पाहून वाटे, झालो जरासा वृद्ध मी
जळल्यावरी सरणात कळले, नक्की अता मेलो अम्ही
आमुचे वार्धक्य जैसे, नाही कधी मी पाहिले
मिटलेच होते नेत्र, नाही मृत्यूसही मी पाहिले

अर्थ साऱ्या जीवनाचा, हाच आहे समजला
समजलो ना मी कुणा, कोणी न मजला समजला
तेही असो पण गर्व ज्याचा, जीवनी मी वाहिला
आज पण त्याही यशाचा, अर्थ नाही समजला
झालो जरा बेचैन, आली डोळ्यात माझ्या आसवे
आसवांचाही मला ना, अर्थ काही समजला
अर्थ जेंव्हा जीवनाचा, सूज्ञास मी पुसला स्वये
काय सांगू, त्यास माझा, प्रश्नही ना समजला

समजू नका की, आसवे नयनातुनी या वाहतो
अस्तास माझ्या यौवनाच्या, अर्घ्य आम्ही वाहतो
जाणतो, हा सूर्य आता, उगवायचा नाही पुन्हा
जीवनाची वेल आता, बहरायची नाही पुन्हा
आता तमाशी गाठ आहे, येथून अमुची व्हायची
आता परीक्षा पौरुषाची, येथेच आहे व्हायची
होती अम्हा जाणीव, याला सज्जही आहो अम्ही
राहण्या गाफील कोणी, नेहरु नाही अम्ही

या तमाची ना तमा, आम्ही असे साधे नव्हे
आहो ऋषींचे पुत्र आम्ही, रस्त्यातले कुत्रे नव्हे

बेफाट आहे खेळलो मी, स्वच्छंद येथे अजवरी
चाळीत आता स्वस्थ बसलो, जीवनाची डायरी
जेथे जिथे दिसतो गुन्हा, दोन आसू गाळतो
कापऱ्या हाती पुन्हा पण, पान दुसरे उलटतो
प्रत्येक पानी टपकल्या या, आसवा पाहूनिया
काही म्हणो कोणी परंतु, माझी मला आली दया

म्हटले कधी का मी प्रभो, की मला रडवू नको
फक्त माझी आसवे ही, इतरा कुणा दावू नको

बेवफाई जाणुनी मी, जीव तिजवर लाविला
जाणूनि प्रासाद माझा, वाळुवरी मी बांधिला
इंद्र मी, श्वानापरी धावलो मागे तिच्या
मागीतले सारे दिले, विश्वासुनी वचनी तिच्या
अमृताचे कुंभ मी, लाथाडिले पायातळी
पायातळीच्या वाकुनी, वेचिल्या पत्रावळी
सांगू खरं का, कां म्हणूनी, केला स्वतःचा नाश मी
बेवफाईचीच होती, जीवनी माझ्या कमी

ऐसे नव्हे इष्कात आम्हा, काही कमी होते घरी
हाय ! मी गेलो तरीही, दीनापरी दुसऱ्या घरी
अर्थ का याचा कुणा, पाहिजे सांगीतला
आम्ही अरे, गमतीत थोडा, जोगवा मागीतला
सुरुवात साऱ्या दुर्दशेची, येथून होऊ लागली
भिक्षा जशी झोळीत अमुच्या, खूप येऊ लागली

वाटले, आम्ही म्हणोनी, लाभली भिक्षा अशी
कळते अता, ही क्षुद्र भिक्षा, कोणासही मिळते अशी
भिक्षेत का सन्मान काही, आहे कुणाचा राहिला
होता घरी जो काय तोही, आता घरी ना राहिला
झाल्यावरी बर्बाद आले, हे ही कळोनी शेवटी
ऐश्वर्यही भिक्षेतले या, भिक्षाच होते शेवटी

आजही साऱ्या स्मृती, आहेत माझ्या भोवती
वाटे जसा मी इंद्र आणि, अप्सरा या भोवती
दोस्त हो, इष्कातही या, काही कुठे नाही कमी
होते कमी तेंव्हाच, तेंव्हा आसवे होती कमी

मी तरी ही आत्मनिंदा, का करावी येवढी
निर्भत्सिण्या आम्हास सारी, दुनियाच आहे येवढी
लाजलो नाही कितीही, निंदिले यांनी तरी
लाजलो नक्कीच असतो, कोणी कमी असता तरी

नाही फुले नाही फळे, नाही कळ्या ना पालव्या
डोकावते आशा तरीही, पाखरांची पण नव्या

आनंदवीते ना मलाही, ना तमाला उजळते
जीवनाची ज्योत आता, केवीलवाणी तेवते
ज्योत जैसी जीवनाची, निस्तेज व्हाया लागली
प्रीतहि माझी तमाशी रोज वाढू लागली

रडताच ना आले अम्हा, जन्मण्या आधी कधी
येईल का रडता पुन्हा, मेल्यावरी आम्हा कधी
वाटले की याचसाठी, जन्म घ्यावा एकदा
वाटले फेडून घ्यावी, हौस तीही एकदा



काव्य
२२९५८
२४२९

आरंभही मी जीवनाचा, रडण्यातुनी केला सुरू
अंतावरी राहील वाटे, कार्य हे माझे सुरू
आता जसा निःशंक रडण्या, सरसावलो थोडा पुढे
आले स्वये भगवान आणि, टाकिली गीता पुढे
याही जरी जन्मात आम्हा, देईल ना कोणी रडू
मी तरी सांगा अता, कोठे रडू केंव्हा रडू ?
बोललो, रडलास तूही, हरवता सीता तुझी
रडता अम्ही, आम्हापुढे, टाकिसी गीता तुझी
ओशाळला ऐकून, आली सारी स्मृति त्याला पुन्हा
भगवानही, मी काय सांगू, माझ्यापुढे रडला पुन्हा
आसवे त्याचीच पुसली, नयनातुनी आम्ही स्वये
प्रार्थुनी म्हणतो कसा, 'सांगू नको कोणास हे'
बोललो की, 'व्यर्थ आहे सारी अशी शंका तुझी
राखायची आहे मलाही, परमेश्वरा अब्रु तुझी'
रडण्यातही सौंदर्य माझ्या, ना जरी बघते कुणी
भगवन्, अरे ही शायरीही, ऐकिली नसती कुणी

निर्भत्सिती या जीवना, ती दर्शने वाचू नका
कोणताही राग गा, पण 'जोगिया' गाऊ नका
संगीत अपुल्या जीवनाचे, अंतावरी गाऊ सुखे
मंद्रात मिळवू प्राण आणि, ठेक्यात देऊ आचके

वेचले आयुष्य नुसते, आसवे गाळीत मी
वेदीवरी या वेदनांच्या, यौवना जाळीत मी
उच्चारिले उत्स्फूर्त जे मी, मंत्र त्या यज्ञातले
शायरी समजू नका, हे मंत्र त्या यज्ञातले

□□□

# विनोद

निर्दाळण्या दुष्टास तुजला, त्रास घ्यावा लागला
देह घ्यावा लागला, अवतार घ्यावा लागला
त्याहुनी दुर्वृत्त आम्ही, त्रासविले ना तुला
मेलो असे गुपचाप की हे, माहीतही नाही तुला

अद्यापही मी नीलव्योमी, चंद्र नाही पाहिला
समजू नका सांगेन तुम्हा, कोठे कसा मी पाहिला
ऐसे नव्हे, तुम्हास काही, सांगू नयेसे वाटते
तुमच्या अरे, संभावितीची, शंका मनाला वाटते

जेंव्हा तिचा मुखचंद्र आम्ही, जवळून अगदी पाहिला
दुर्बिणी घेऊन वाटे, चंद्र जैसा पाहिला
चंद्रापरी ते डाग जेंव्हा, गालावरी दिसले मला
सादृश्यही उपमेतले त्या, तेंव्हा कुठे पटले मला

उपमा तुझी वदना प्रियेच्या, देतात हे सारे कवी
चंद्रा, तुझ्या तुज पौरुषाची, लाज वाटाया हवी
लीला तुझी या तारकांशी, पाहून ही सारी अशी
कळले अम्हा, ही रोहिणीही, निःशंक का आहे अशी

हेल्थ माझ्या प्रेयसीची, खूप आहे चांगली
सांगतो, इतुकेच की तो, इतकी नसावी चांगली
आलिंगनी त्यांच्या जरी का, गवसलो नसतो अम्ही
सांगतो, नक्कीच नसतो, प्लॅस्टरमध्ये आता अम्ही
दोस्त हो, तीही खरी, नव्हती अशी आता परी
नव्हती जराही स्थूल, होती चारचौघींच्या परी

येता परी स्त्रीवर्ष, त्यांची भलतीच शक्ती वाढली
वाढली जी काय अमुची, नुसतीच दाढी वाढली

चुंबने जोरात आम्ही, नाही अताशे घेतली
वाटले घ्यावी तशी, नाही तरीही घेतली
काळजी नाजूकतेची, त्यांच्या तशी नव्हती मला
होती जरा माझ्याच, खोट्या दंतपंक्तींची मला

लाजायचे जे काय सारे, पहिल्याच दिवशी लाजली
त्यापुढे प्रत्येक वेळी, आमचीच स्वारी लाजली

सावराया अंचलाते, विसरल्या आहेत त्या
लाजून त्याचे टोक अधरी, ना कधी धरतील त्या
हे बरे की आज तैसे, लाजले नाही कुणी
लावील का अधरास अपुल्या, स्कर्टहि अपुला कुणी ?

राहून पदराआड ज्यांनी, नजरेस माझ्या बांधले
इतुके बरे की त्यास तूही, आहेस पक्के बांधले
ऐसे जरी, औदार्य अमुचे, तूं सांग त्यांना एकदा
मुक्तही करण्यास त्यांना, आम्हीच येऊ एकदा

जन्मभर मीही कुमारी, नसते कधीही राहिले
इतरापरी संसारकार्यी, मग्न असते राहिले
हातही मज लावण्याला, प्रत्येक होता भ्यायला
जो तो मला पाहून माझ्या, नाजूकतेला भ्यायला

सावरीले अंचलाला, घाईत तूं बघता मला
संभावितीचा अर्थ माझ्या, तेंव्हा कुठे कळला मला

जाणतो केंव्हाच नाही, उगवायचा तुमचा उद्या

वाटे तरीही तूं म्हणावे, 'आता नको, पाहू उद्या'
बोलेन मग त्रासून मीही, 'जाऊ द्या, तुमचा उद्या'
सांगेन आणि, 'आज हाही कालचा आहे उद्या'

नुसती जशी डोक्यात आली, चुंबनाची कल्पना
गोऱ्या तिच्या गालावरी, उमटल्या साऱ्या खुणा
पाहून हा परिणाम माझे, काळीज जैसे थांबले
कल्पनेचे खेळ माझे, तेथेच नव्हते थांबले
दोषही याहून दुसरा, नव्हता जरी माझ्याकडे
नेले तिला तात्काळ त्यांनी, मॅर्टनिटी वॉर्डाकडे
बोलली की 'आवरा, कल्पनांना या अशा
कुठवरी या बालकांना, जन्म देऊ मी अशा
नेऊ नको ऐसे मला, चिंतनी तूं सारखे
सोसेल का इतुके मला, बाळंत होणे सारखे
चिंता जरी याची तशी, आपणा नसली तरी
वाटायला सांगा नको कां, लोकसंख्येची तरी'

भीड मज बाई कुणाची, मोडवत नाही कधी
सुचविता कोणी कसेही, नाहीच ना म्हणवे कधी
एकदा सांगून बघते, 'हे बघा, ऐका जरा
ऐकायचे नाही तुम्हा मग, काय वाटेल ते करा'

जोडतो मी हात देवा, स्वर्गी मला नेऊ नका
सांभाळणे आहे तुम्हा जर, उर्वशी अन् मेनका

मजनू अरे, भलताच काही, पंथ तूं हा काढला
दोस्ता, असा तूं जन्म सारा, रडण्यात नुसता काढला
सौंदर्य तर आम्हासही, कळते जरा रडण्यातले

रडण्यातले तुझिया नव्हे, लैलाचिया रडण्यातले
मजनू अरे, थोडा जरी का, धीर हा धरतास तूं
रडती तुझी लैलाच आणि, जन्मभर हसतास तूं
हे खरे, इष्कात कांही, थोडे रडावे लागते
वेडचा, अरे इष्कात सारे, खोटे रडावे लागते
मजनू, अरे ऐसे नव्हे की, तूच लैला पाहिली
एकदा तिजला अम्हीही, जन्मात होती पाहिली
समजू नको की तूच होता, मजनू जगी या एकटा
माझ्यातरी लैलास मजनू, मीच नव्हतो एकटा

मोल मोत्यांचे तुझ्या, आसवांना मी दिले
आसवे पाहून तुमची, काय मी नाही दिले
कळले अता इष्कात नुसता, मूर्ख मी होतो खरा
सारेच ते कल्चर्ड होते, एकही नव्हता खरा

घेतला संन्यास आता, चित्त ना रमते कुठे
यासही पण आज विटता, सांगा अता जाऊ कुठे ?

चुंबिले नक्कीच असते, मी तिला तिथल्या तिथे
नसता जरी का भव्य फोटो, लोकमान्यांचा तिथे
निर्लज्जता माझ्यातही, नव्हती जरी काही कमी
भ्यायलो हातातल्या त्या, लट्ठ वेताला अम्ही
चातुर्यही भलतेच तेंव्हा, दाविले आम्हा तिने
घेतला ओढून पडदा, फोटोवरी जेंव्हा तिने
प्रतिसादही त्या चतुरतेने, होता तिला मीही दिला
चुंबने घेता जराही, आवाज ना होऊ दिला

वृद्ध मी नाही जरी, निवृत्त झालो फारसा

सोडिल्या मी दोन गोष्टी, कंगवा अन् आरसा

नजरही नजरेस अमुच्या, असती जरी त्यांनी दिली
वाटते, नक्कीच असती, संमती त्यांनी दिली
दुसऱ्याकडे इतक्याचसाठी, त्यांना बघावे वाटले
हाय! पण दुसऱ्यासही त्या, हेच होते वाटले
पाहिले सर्वांकडे, टाळुनी आम्हा तिने
ना म्हणू आम्ही तरीही, टाळिले आम्हा तिने
टाळण्या आम्हास जेंव्हा, बघितले आधी तिने
आम्हा दिला सन्मान जैसा, अग्रपूजेचा तिने

पाहिली असती जरी का, लैला तशी कोठे अम्ही
शायरी नक्कीच काही, निर्मिली असती अम्ही
दैन्य पण अमुचे असे की, मीच सारे व्हायचे
मीच लैला व्हायचे अन्, मीच मजनू व्हायचे

जेंव्हा कधी या डॉक्टरांची, भेट घ्यावी लागते
म्हणण्यासही 'जगवा', मनाला लाज वाटू लागते
सौजन्यही या डॉक्टरांचे, आता खरे कळले मला
'व्यर्थ का जगता?' असेही, कोणीच ना पुसले मला

येतो फिराया तुजसवे, ऐक जे सांगेन मी
नेसायचे नऊवार तू अन्, मागे तुझ्या चालेन मी

होणार होतो मुक्त अगदी, नव्हती मला कसली तमा
हाय! पण ही आड आली, अर्धांगीची वटपौर्णिमा

□□□

## मृत्यू

मत्तगंधाची जिथे, रानवेलीची फुले
दिसतील तेथे, जाण माझे, प्रेत आहे गाडले
मोहुनी येतील जेंव्हा, भृंग त्या कुसुमावरी
जाणतो, मस्तीत तेथे, गातील माझी शायरी

मृत्यूची तर हौस मजला, मेलो असा कित्येकदा
आवडे मज जन्मणेही, जन्मलो कित्येकदा
इतुकेच की, एकाच वेळी, एक मजला आवडे
जगता भितो मृत्यूस जाणि, जन्मता येते रडे

मृत्यूची ना खंत मजला, काय मी जगुनी करूं ?
कां करूं इन्कार जगण्या, काय मी मरुनी करूं ?
दोहोमध्ये इतुकाच दिसतो, भेद हा माझ्या मते
आहेत उघडे नेत्र आता, मेल्यावरी मिटतील ते

जाऊनही तीर्थप्रयागी, काय ते मिळवीन मी
ऐसे नव्हे की वेगळा, मृत्यू तिथे पाहीन मी
वाटते सारेच तिथले, आज मज आहे इथे
गंगा इथे, यमुना इथे, काळही आहे इथे

आशा तुझी, मृत्यो अम्हाला, केवढी ही वाटते
सोसतांना यातना या, चिंता मुळी ना वाटते
दुःख आणि संकटे जी, उरतील अमुची शेवटी
घेशील त्यांचा घास मृत्यो, तूच नक्की शेवटी

जाणतो नरकात भगवन्, लोटुनी देशील तूं
उभवीन तेथे स्वर्ग मग, लाजुनी म्हणशील तूं

जाऊ द्या सारेच विसरा, सारेच आता जाऊ द्या
सोडिला मी स्वर्ग मजला, येथेच आता राहू द्या

काय सांगू शेवटी या, जीवनाची दुर्गती
उर्ध्व होता लागला, पण हरवली नव्हती स्मृती
होते उभे बाजूस कांही, लौकिकास्तव सोयरे
मूल्य माझ्या जीवनाचे, तेंव्हा मला कळले खरे

मेल्यावरी दुर्दैव ज्याला, भोगावयाचे राहिले
नावही दुनियेत आहे, त्याचेच मागे राहिले
तो पहा वाल्मिक ज्याचा, ग्रंथ आम्ही जाळला
कळते जरी हे त्यास आधी, त्यानेच असता जाळला

उबगलो दुनियेस, वाटे, येथे पुन्हा येऊ नये
नावही दुनियेत माझे, मागे कुठे राहू नये
होता मला संतोष असते, इतुके जरी मी साधले
शायरीने हाय ! नाही, हेही अम्हाला साधले

भेट जर मृत्यो तुझी, आधी मला होती अशी
झालीच नसती जीवनाची, शोकांतिकाहि ही अशी

मागितले जे जे कुणी, ते ते अम्ही त्याला दिले
हाच अमुचा धर्म कोणा, विन्मुख ना जाऊ दिले
मागसी तू प्राण आता, तेही तुला देऊ अम्ही
घे जरा पाहून तेही, हासुनी देऊ अम्ही

□□□

# दार्शनिक

बोलाविते हे विश्व तेंव्हा, विश्वाकडे पाहू अम्ही
ना तरी नुसतेच अपुले, अपुल्याकडे पाहू अम्ही
द्रष्टुत्व अमुचा धर्म आम्हा, पाहण्या काही हवे
ना म्हणू केंव्हाच आम्ही, हे नको अन् ते हवे

कोणीच ना येथे कुणाचा, आम्हासही कळते तसे
दोस्त हो, समजूनही हे, वागायचे नसते तसे
मानू अम्ही की सूज्ञतेने, तोच आहे वागला
समजूनही वेदांत सारा, नाही तसा जो वागला

अंतरीचा तम जरासा, उजळावयाचा राहिला
आहे अविद्या लेश कांही, ज्ञानोत्तरीही राहिला
इतुका जरी अध्यात्म कोणी, चंद्रात आहे पाहिला
मानू अम्ही, त्यानेच आहे, चंद्र काही पाहिला

सांगती की सर्व खोटे, काहीच ना येथे खरे
इतुके बरे, हे सर्व खोटे, हे तरी आहे खरे

एकटा मज पाहण्याला, शर्थ मी केली पुरी
दूर मी नेले मला, रानीवनी विजनी तरी
तेथेही नव्हतो एकटा, द्वैत वासुनी 'आ' उभे
नाशिता द्वैतास होते, शून्य मज खाया उभे
कंटाळलो द्वैतास मी, मज धाक शून्याचा उरी
ना कळे जाऊ कुठे, दोन्हीकडे दिसते सुरी
शेवटी संतापलो अन्, ब्रह्मांड ग्रासुनि बैसलो
द्वैत गेले, शून्य गेले, एकटा मी राहिलो

अजवरी स्वप्नात होतो, जाग आता ये मला
जाग कसला हा खरोखर, जागही स्वप्नातला

'सारेच आहे स्वप्न येथे', मानतो हे सत्य मी
हाय ! पण वेदांतही हा, वाचला स्वप्नात मी

आहे जरी हे स्वप्न खोटे, हेच प्रिय मज वाटते
काय सांगू भय मनाला, जागृतीचे वाटते

जेंव्हा उपाधी बंधनांना, सोडून आम्ही पाहिले
भलतेच काही रूप तेंव्हा, अपुले स्वतःचे पाहिले

दचकलो पाहून माझ्या, शून्यसम रूपा तशा
शेवटी गुंडाळल्या मी, चिंध्या जशा होत्या तशा

स्वीकारल्या जेंव्हा उपाधी, होत्या तशा साऱ्या पुन्हा
झाली तयारी पूर्ण तेंव्हा, आत्मघाताची पुन्हा

आता पुन्हा निःशंक सारे, शास्त्र पाहू लागलो
व्हावयाला मुक्त कांही, मार्ग पाहू लागलो

नष्ट झाला मोह जेंव्हा, वाचली मी दर्शने
आनंदलो क्षणमात्र ऐशा, सत्याचिया त्या दर्शने

सांगूच का आता मला, काय जे वाटे खरे
आहे उराशी दुःख आता, मोहनाशाचे खरे

स्वप्न नुसते जीवनाचे, सारखें मी पाहतो
पाहतो झोपेत तैसे, जागेपणीही पाहतो
खोटेपणा तर सारखा, पाहतो दोहोत मी
इतुकेच की या जागृतीचा, वाटतो थोडा कमी

'आज' माझे नांव आहे, आहे उद्याचा 'काल' मी
कालचा आहे उद्या, ना मी उद्या, ना काल मी

'आज' माझे नांव आहे, मी वर्तमानी राहतो
भूत, भावी शब्द तुमचे, ऐकून गाली हासतो
निष्कंप हे अस्मान, आहे तैसाच मी सांगू किती
फिरविता मज व्यर्थ, म्हणता कालचक्राची गति
जाणतो की व्यर्थ आहे, माझे तुम्हा समजावणे
इतुकेच आहे ज्ञान तुमचे, भलत्यास भलते समजणे

नुसतेच आहे स्वप्न, आहे भास हा नुसता खरा
स्वप्नही नाही खरे, ना पाहणाराही खरा
ऐसे जरी हे स्वप्न जेंव्हा, आम्हा रडाया लावते
मूर्खता रडण्यातली या, जास्ती रडाया लावते

आहे जरी विश्वास साऱ्या, सौंदर्य आम्ही पाहिले
का म्हणू त्या ईश्वराला, अगदीच नाही पाहिले
ऐसे जरी, संपूर्ण त्याच्या, रूपास ना मी पाहिले
पाहिले जे काय होते, अगदी कमी ना पाहिले

भगवन्, अरे ऐसे नव्हे, अवमानिले आम्ही तुला
सांगूनियाही काय वाटे, कळणारही नाही तुला
पापात्मता पाहून माझी, होतो असा मी लाजलो
नांवही घ्याया तुझे, इतुक्याचसाठी लाजलो

समजू नका की व्यर्थ त्याने, वार्धक्य हे आम्हा दिले
आहे जसे वरदान काही, निवृत्त व्हायाला दिले
इंद्रिये विषयास अपुल्या, भोगून मागे परतली
सेना जशी विजयोत्सवाला, मायदेशी परतली
वेलही या वासनेची, ठाईच आहे बहरली
आज ती निर्वासनेच्या, भगव्या फुलांनी बहरली

जे दिसे प्रत्यक्ष तेही, आहे जरी खोटे असे
अदृश्य त्या देवास सांगा, सत्य मी मानूं कसे ?
आहे जरी साराच भ्रम हा, काय हा आहे कमी
यापुढे जाऊन दुसरा, का करूं निर्माण मी ?

चेहेरा जेंव्हा स्वतःचा, दर्पणी मी पाहिला
सांगतो प्रत्यक्ष तेथे, हनुमान आम्ही पाहिला
मिचकावुनी डोळे मला तो, फक्त इतुके बोलला
वेडचा, अरे आता कुठेही, राम नाही राहिला
कंठ झाला रुद्ध, त्याच्या नयनात आली आसवे
आली मलाही कीव, आली, अमुच्याही नयनी आसवे
बोललो, रामास का या, दुनियेत असते पाह्यचे
म्हणशील केंव्हा राम, आहे इतुकेच आता पाह्यचे
काय नाही भोगिले तूं, आज जे वाटे हवे
भोगिले आहेस सारे, भोगावया जे जे हवे
संतृप्त का मरतो कुठे, नुसता इथे तो झोपतो
झाल्यावरी स्तनपान जैसा, बाळ तान्हा झोपतो
मृगजळाचा भास जैसा, रेतीवरी या सारखा
तैसाच साऱ्या जीवनाचा, मृत्यूवरी या सारखा
हाच आहे सत्य, याला कोणी जरी ना पाहतो
स्वप्न साऱ्या जीवनाचे, हाच अपुले पाहतो
स्वप्नातल्या या आकृतीला, तूं रूप अपुले समजला
म्हणतोसही वरतून आम्हा, वेदांत आहे समजला
मारुते, सांगूनियाही, समजेल का तुजला कधी
आकृत्या स्वप्नातल्या का, जन्मल्या, मेल्या कधी
आता जरा मी त्यास गाली, हासतांना पाहिला
दर्पणी नाही पुन्हा तो, हनुमान आम्ही पाहिला □□□

भास्करा, येते दया, मजला तुझी आधीमधी
आहेस का रे पाहिली तू, रात्र प्रणयाची कधी ?

(यावर सूर्य शायराला उत्तर देतो)

आम्हासही या शायराची, कीव येऊ लागते
याच्या म्हणे प्रणयास याला, रात्र यावी लागते
ना म्हणू की इष्क त्याला, आहे जराही समजला
इष्कातही दिवसास की जो, रात्र नाही समजला

खेळू नको बेधुंद ऐसा, चंद्रा अरे, तारांसवे
घे जरा लक्षात आहे, रोहिणीही तुजसवे
पृथ्वीवरी असतास जर का, छंद तू हा घेतला
खास तुझिया रोहिणीने, डायव्होर्स असता घेतला

तोंडही जेंव्हा कुणाला, दावू नयेसे वाटते
दुनियेसही अमुच्यात कांही, तेंव्हाच आहे वाटते

नजरेस मिळवी नजर वा, नजरेस तू येऊ नको
एक यातील कर हवे ते, वाया अशी जाळू नको

भारताची राजनीती, समजण्याला लागते
षंढताही खूप, थोडी-थोडकी ना लागते
खूप केला यत्न आम्ही, आम्हास नाही समजली
ना कळो आम्हास, आहे पुष्कळांना समजली
आता कशाची लाज, आता काश्मीरही देऊ अम्ही
काय त्याने भारताचे, व्हायचे आहे कमी

दिल्ली जरी गेली तरीही, हार ना आम्ही म्हणू
उंचावुनी लुंग्या स्वतःच्या, 'जय जगत' आम्ही म्हणू
बोलू नका कैलास, आम्हा धार्मिकता कोठे नको
गाऊ नका शिवभूप, आम्हा जातीयता कोठे नको
आहे निधर्मी राज्य येथे, अस्मिता नुसती हवी
केंव्हाच ना सांगू अम्ही, कां हवी, कसली हवी

देवा अहो सामर्थ्य माझे, समजू नका काही कमी
तुमच्या दयेच्या सागराला, केंव्हाच केला शुष्क मी
जागलो कित्येक रात्री, फक्त तुझिया चिंतनी
लागले ना नेत्र पळही, गीतेतला जणु संयमी
जागतो मी आजही, इतुक्याचसाठी रात्र ही
भेट ना होवो अता, माझी तुझी स्वप्नातही

नेवो स्त्रिया ओढून, त्यांना केंव्हाच ना शत्रू म्हणू
काय मोठे त्यात, आम्ही मेहुणे त्यांना म्हणू
होता असा अपहार आम्हा, खेदही नाही तसा
नाहीतरी षंढास त्यांचा, उपयोगही नसतो तसा
सांगतो निक्षून आम्हा, शांति हवी, शांति हवी
सांगतो तीही पुन्हा, अमुची नको, त्यांची हवी

ऐसे नव्हे या भारती या, बुद्ध नुसता जन्मला
नुसताच नाही बुद्ध येथे, आहे शिवाजी जन्मला
वीरतेची भारती या, ना कमी झाली कधी
आमचा इतिहास नुसता, इतिहास ना झाला कधी
तीच आहे हौस आम्हा, व्हावया समरी शहीद
बाजी प्रभूही आज आहे, आज जो अब्दुल हमीद

बोलला इतुकेच अंती, ' आगे बढो, आगे बढो '
देऊन गेला मंत्र जैसा, ' आगे बढो, आगे बढो '
धर्माहुनीही श्रेष्ठ अपुल्या, देशास जो या समजला
मानू अम्ही त्यालाच आहे, धर्म कांही समजला
जन्मला जो जो इथे तो, वीर आहे जन्मला
अध्यात्मही या भारताचा, युद्धात आहे जन्मला

□□□

विसरावया हवेच तुला, विसरायचे कसे ?
नयनात येत नीर तया, रोकायचे कसे ?
वाटे नको कुणास व्यथा, माझी कळावया
गाली हसू, परंतु बळे, आणायचे कसे ?
'भेटेन मी खरेच तुला', आश्वासीलेस तूं
सारे खरे, परंतु खरे, मानायचे कसे ?
आसूतही अम्हास अता, जे काय लाभले
सांगायचे कुणास, कुणा, समजायचे कसे ?

□□□

नयनात तुझ्या जो भाव हसे, शब्दात तुझ्या ऐकेन कधी ?
हे मूक काव्य स्वर शब्दांचा, आकार तरी घेणार कधी ?
सात जन्मीच्या सहवासाहुन, जवळ अशी आलीस जरी
अनोळखीचा अभिनय हा, हासून जरा संपेल कधी ?
उन आसवे, उन उसासे, उन श्वास निःश्वास असे
हा पंचानल, प्रीत-सुधेचे, दान तरी देणार कधी ?

□□□

## गीत

येथुनि अपुले मार्ग निराळे, रुचेल तिकडे जायाचे
भूतकाळ हा विसरुनि अवघा, चल हासू या अखेरचे
परस्परांच्या चिता भडकवू, आपण अपुल्या हाती या
भूतकाळही त्यात जाळुनि, मुक्त होऊ या अखेरचे
येथून घेऊ जन्म नवा, देह नवा अन् ध्येय नवे
उरल्या आयुष्यात साधुनि, घेऊ कांही अखेरचे
राग लोभ अनुराग येथला, टाकुनि सारा येथेच
चला गाऊ या, होवो मंगल, भरतवाक्य हे अखेरचे

REFBK-0022956
REFBK-0022956

□□□

काव्य
२२९५६
२४२९



भाऊसाहेब पाटणकर

ॲडव्होकेट भाऊसाहेब पाटणकर महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्व दिल्ली ते हैद्राबादपर्यंत 'मराठी शेरोशायरी'च्या शेकडो मैफिली आत्मविश्वासानं जिंकणारा एकमेव कलंदर. शिकार, संगीत, अध्यात्म अशा वेगवेगळ्या क्षेत्रात समरसून जाणारा, उर्दू काव्याचा कैफ मराठी भाषेत निर्माण करणारा एक विलक्षण जिंदादिल. शृंगार ते अध्यात्मापर्यंत जीवनाच्या विविध टप्प्यांची वाटचाल रसिकतेनं आणि डोळसपणे करणारा एक वाटसरू.

त्यांच्या कवितेत उर्दू कवितेची धुंद आहे पण तिची 'लगन' मात्र अस्सल 'मऱ्हाटी'शी आहे. त्यांची चिंतनशीलता प्रत्येक शेरातून जाणवते, नव्हे प्रत्येक रसिक हृदयाचा ठाव घेते.

'मराठी शायरी', 'मराठी मुशायरा', 'मैफिल' आणि 'दोस्त हो' या पूर्वीच्या कलाकृतींना भाग्यवंत रसिकांनी अमाप दाद दिली. आता 'जिंदादिल' ही रसिकांची अशीच 'वाहवा' घेईल.

- जिंदादिल

मूल्य : १० रुपये

( मुखपृष्ठ : मंदार प्रिंटर्स, पुणे )